सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, २१ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १८० | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

मोटरसायकलच्या धडकेत बस चालक जखमी

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : कामगारांना खाजगी बसणे ने - आण करणाऱ्या बस चालकास नाश्ता करण्यासाठीं पायी जात असताना मोटरसायकलने जोराचे धडक देऊन जखमी केले. याविषयी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की मधुकर बन्सी गायकवाड वय ५० वर्षे (चालक) रा रामनगर सिडको छत्रपती संभाजीनगर हे दिनांक १४ सप्टेंबर सकाळी अंदाजे ०६.४५ वाजेच्या सुमारास कामगारांना कारखान्यात पोहचवून बस रस्त्याच्या कडेला उभी व्हेराँक इंजिनियरींग या कारखान्यासमोरून फोष्टर कंपनीकडे सकाळी ७ वाजेच्या सुमारास पायी जात असतांना, स्प्लेंडर कंपनीच्या काळ्या रंगाच्या चक २० ऋऋ ३३८१ च्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून जोराची धडक दिली. यात बस चालक जबर जखमी झाले. धडक दिल्यानंतर मोटर सायकल चालक तिथून फरार झाला. उपस्थित लोकांनी त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी तपासून डाव्या पायाचे हाड मोडल्याचे सांगितले. हॉस्पिटल मधून सुट्टी होताच दाखल केलेल्या एम एस सी वरून २० सप्टेंबर रोजी वाळुज एमआयडीसी पोलीस ठाण्यात मोटर सायकल चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. कॉ. गिरी हे करीत आहेत.

उपचारादरम्यान एकाचा मृत्यू

वाळूज महानगर : साजापूर येथील सलीम रजाक शेख वय ५१ वर्ष यांना २० सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास राहत्या घरी श्वास घेण्यास त्रास होऊ लागल्याने त्यांना ईस्माईल ईब्राहिम शेख यांनी घाटी रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तारव हे करीत आहेत.

शॉक लागून कामगाराचा मृत्यू

वाळूज महानगर (प्रतिनिधी) कृष्णनगर रांजणगाव ता गंगापुर छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी पारस गोवर्धन विश्वकर्मा वय ३६ वर्ष हे घाणेगाव येथील एका कंपनीत मशीनवर काम करीत असतांना त्यांना १९ सप्टेंबर रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास ईलेक्ट्रीक शॉक लागून ते बेशुध्द झाले . बेशुद्ध अवस्थेत त्यांना सुपरवायझर राजू जाधव व केशवलाल गूजर यांनी घाटी रुग्णालयात दाखल केले असता, दुपारी अडीच वाजेच्या सुमारास डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलिस निरीक्षक कृष्णचंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार तारव हे करीत आहेत.

पश्चिम बंगालमधील डॉक्टरांचा संप मागे!

कोलकाता : पश्चिम बंगालमधील महिला डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या विरोधात ४२ दिवसांपासून आंदोलनरत असलेल्या डॉक्टरांनी तुर्तास संप मागे घेतला आहे. परंतु, ७ दिवसात मागण्या पूर्ण न झाल्यास पुन्हा एकदा काम बंद केले जाईल असा इशारा दिलाय.

पश्चिम बंगालमध्ये, कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येप्रकरणी ज्युनियर डॉक्टरांनी शनिवारी आपला निषेध संपवला आणि कामावर परतले. तब्बल ४२ दिवसांच्या आंदोलनानंतर डॉक्टरांनी कामावर परतण्याचा निर्णय घेतला. ज्युनियर डॉक्टरांनी फक्त इमर्जन्सी ड्युटीसाठी परतण्याचे मान्य केले आहे, ओपीडी अजूनही बंद राहणार आहे.

आंदोलन करणारे कनिष्ठ डॉक्टर अनिकेत महतो म्हणाले की, आम्ही पुन्हा कर्तव्यावर परतलो आहोत. आमचे सहकारी आपापल्या विभागात परतले आहेत. आम्ही आज सकाळी फक्त अत्यावश्यक आपत्कालीन सेवांसाठी आलो आहोत, ओपीडीमध्ये नाही. कृपया हे विसरू नका की आम्ही फक्त आमचे कर्तव्य बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे

इतर सहकारी आधीच राज्यातील पूरग्रस्त भागात रवाना झाले आहेत, जिथे ते सुरू असलेल्या निषेधांमध्ये सार्वजनिक आरोग्याप्रती त्यांची बांधिलकी दर्शविण्यासाठी अभय क्लिनिक्स (वैद्यकीय शिबिरे) सुरू करतील असे त्यांनी सांगितले. दरम्यान मृत डॉक्टरांना न्याय मिळावा आणि राज्याच्या आरोग्य सचिवांना हटवावे या मागण्या प्रशासनाकडून पूर्ण करण्यासाठी पुढील ७ दिवस वाट पाहणार असल्याचे आंदोलक डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या मागण्या मान्य न झाल्यास ते पुन्हा एकदा काम बंद आंदोलन करणार आहेत. पश्चिम बंगालमध्ये ९ ऑगस्टपासून डॉक्टरांची निदर्शने सुरू आहेत. या प्रकरणाचा तपास सध्या सीबीआयकडे आहे. आरजी कार हॉस्पिटलचे माजी प्राचार्य संदीप घोष यांच्यासह अनेकांना अटक करण्यात आली आहे.

कोलकात्याच्या आरजी कार मेडिकल कॉलेज-हॉस्पिटलमध्ये एका ज्युनियर डॉक्टरसोबत क्रूरतेची घटना ९ ऑगस्ट रोजी घडली होती. मृत हा मेडिकल कॉलेजच्या चेस्ट मेडिसिन विभागाचा पदव्युत्तर द्वितीय वर्षाचा विद्यार्थी आणि प्रशिक्षणार्थी डॉक्टर होता. ८ ऑगस्ट रोजी ड्युटी संपवून रात्री १२ वाजता मित्रांसोबत जेवण केले. तेव्हापासून महिला डॉक्टरचा पत्ता नव्हता. घटनेच्या दुसऱ्या दिवशी सकाळी चौथ्या मजल्यावरील सेमिनार हॉलमधून डॉक्टरचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत आढळल्याने वैद्यकीय महाविद्यालयात एकच खळबळ उडाली आहे. घटनास्थळावरून मृताचा मोबाईल फोन आणि लॅपटॉप जप्त करण्यात आला आहे. पोस्टमॉर्टमच्या प्राथमिक अहवालात महिला डॉक्टरसोबत बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. कनिष्ठ महिला डॉक्टरचा मृतदेह गादीवर पडलेला असून गादीवर रक्ताचे डाग आढळून आले. प्राथमिक शवविच्छेदन अहवालात मृत महिला डॉक्टरच्या तोंडावर आणि दोन्ही डोळ्यांवर जखमा असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रायव्हेट पार्टवर रक्ताच्या खुणा आणि चेहऱ्यावर नखांच्या खुणा आढळल्या. ओठ, मान, पोट, डावा घोटा आणि उजव्या हाताच्या बोटावर जखमेच्या खुणा होत्या.

सरसकट शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी मेळाव्याचे आयोजन

पत्रकार परिषदेत मा.आ. नितीन पाटील यांची माहिती

तभा वृत्तसेवा

कन्नड :- राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या वतीने, जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, घाटमाथ्यावरील भगवान गड येथे, माजी आमदार नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त, नितीन पाटील मित्र मंडळाच्या वतीने, रविवार दि. २२ सप्टेंबर रोजी शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंढे हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार नितीन पाटील यांनी दिली आहे.

भगवानगड येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अनुषंगाने भगवानगड येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी बोलतांना ते पुढे म्हणाले की, घाटमाथा परीसरात काही दिवसांपूर्वी अतिवृष्टी झाल्याने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. त्या सर्व शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या वतीने जास्तीत जास्त मदत मिळावी, या साठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच दिवशी माझा वाढदिवस आहे हाही एक योगायोग आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांनी मला शब्द दिलेला असून मी ही निवडणूक लढणार आहे. याउपरही पक्ष जो निर्णय घेईल, ज्याला तिकीट देईल, त्यास निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी जिल्हाध्यक्ष कैलास पाटील म्हणाले की, शेतकरी मेळाव्याच्या तयारीचा आढावा आणि शासनाच्या जनहिताच्या योजनांची माहिती देण्यासाठी मी आलो आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने ९८६१७१७१७१ या व्हॉट्स प क्रमांकावर जनतेसाठी हेल्पलाईन सुरू केलेली असुन, या माध्यमातून, लाडकी बहीण, वीजबिल,विद्यार्थ्यांना विद्यावेतन, वारकऱ्यांसाठीच्या योजनांची माहिती सविस्तरपणे दिली जात असून, या योजनांपासून कुणीही वंचित राहणार नाही असा आमचा प्रयत्न आहे. ते पुढे असेही म्हणाले की, जिल्ह्यात आमची ताकद वाढली असून, कन्नड विधानसभा मतदार संघाची जागा आम्ही सोडवून घेतली आहे. आमचे पक्षप्रमुख अजित दादा पवार यांना मुख्यमंत्री करण्यासाठी राज्यात आमचे जास्तीत जास्त आमदार निवडून आणणे हाच आमचा उद्देश आहे. या वेळी पक्षाचे निरीक्षक हरिभाऊ ढव्हण, उपजिल्हाध्यक्ष अप्पासाहेब निर्मळ, युवानेते अर्जुन पाटील,मार्केटिंग फेडरेशनचे संचालक पांडुरंग घुगे, खरेदी विक्री संघाचे सभापती सुरेश डोळस,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक कैलास अकोलकर, डॉ.राजेन्द्रसिंग चौहाण, रावसाहेब निकम, विक्रम चव्हाण, दिपक वाळुंजे, नासेर पठाण यांच्यासह परिसरातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

निवडणूक चिन्हासाठी पवारांची कोर्टात धाव; सर्वोच्च न्यायालयात २५ रोजी सुनावणी

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट झाल्यानंतर अजित पवारांकडे गेलेल्या घड्याळ निवडणूक चिन्हात अजूनही शरद पवार गटाचे मन गुंतले आहे. त्यामुळे दोन्ही गटांना तुतारी आणि घड्याळ चिन्हांऐवजी नवी चिन्हे द्यावीत या मागणीसाठी पवारांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

शरद पवारांची याचिका तातडीने सुनावणी होण्यासाठी सूचिबद्ध करण्यात यावी, अशी मागणी शरद पवार गटाचे वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी न्या. सूर्य कांत व न्या. उज्ज्वल भूयान यांच्या खंडपीठाकडे केली होती. त्यानुसार ही याचिका २५ सप्टेंबरला सुनावणीसाठी सूचिबद्ध करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटाला खरा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या ६ फेब्रुवारीच्या निर्णयाला शरद पवार यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करा- आयुक्त

अहमदनगर दि.२१ - महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा हा जनतेच्या हक्कांना जपणारा कायदा आहे. जनतेला पारदर्शकपणे व विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवत लोकसेवा हक्क कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिले.

तहसिल कार्यालय कर्जत येथील सभागृहात तालुकास्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत श्रीमती कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी आयोगाचे उपसचिव सुनिल जोशी, सहायक कक्ष अधिकारी प्रशांत घोडके, उप विभागीय अधिकारी नितीन पाटील, तहसिलदार गुरू बिराजदार, गटविकास अधिकारी प्रकाश पोळ, उप विभागीय कृषी अधिकारी आर.बी. सुपेकर आदी उपस्थित होते.

श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या, जनतेला पारदर्शक, गतीमान आणि दिलेल्या कालमर्यादेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक प्रभावीपणे ऑनलाईन सेवा देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा करण्यात आला आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी नोकरी म्हणजे केवळ वेतनापुरती सेवा अशी भावना न बाळगता समाजाप्रती आपलेही काही देणे लागते ही भावना मनी बाळगून सर्वसामान्यांना सेवा द्यावी. जनतेच्या सेवापूर्ततेमध्ये शासकीय अधिकाऱ्यांनी संवेदनशिलतेने काम करावे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतीमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार आहे. विहित मुदतीत उत्तम प्रकारे सेवा देणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा आयोगामार्फत प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार असल्याचेही त्या म्हणाल्या.

लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना व्यापक स्वरुपात प्रसिद्धी देण्यात यावी. अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवा, पदनिर्देशित अधिकारी, अपीलीय अधिकारी तसेच अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिलव सेवा कालावधीबाबतची माहिती कार्यालयात दर्शनी भागात लावण्याच्या सुचनाही श्रीमती कुलकर्णी यांनी यावेळी दिल्या. अधिकाऱ्यांनी अर्ज, अपील यांची तपासणी करून ते विहित वेळेत निकाली काढावेत. सेवा देण्यामध्ये काही अडचणी असतील तर आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्ह्यातील ५० महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन शुभारंभ

अहमदनगर, दि.२०- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वर्धा येथून जिल्ह्यातील ५० महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा शुभारंभ ऑनलाईन पद्धतीने करण्यात आला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग विळदघाट येथील जिल्हास्तरीय कार्यक्रमास जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी सुनिल शिंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे बालाजी बिराजदार, ग्रामोद्योग अधिकारी बी.आर. मुंडे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. उदय नाईक आदी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी सालीमठ म्हणाले, आजच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कौशल्यावर आधारित शिक्षणाला फार मोठे महत्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणाबरोबर कौशल्यावर आधारित शिक्षण घेत जीवनात

यश संपादन करावे. महाविद्यालयीन शिक्षणासह विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्यावर आधारित प्रशिक्षण मिळणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात युवक-युवतींना सक्षम बनविण्यासाठी महाविद्यालयामध्ये सुरू केलेले कौशल्य विकास केंद्र अतिशय महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

जिल्ह्यातील अकोले तालुक्यात ३ प्रशिक्षण केंद्र, कर्जत २, कोपरगाव ६, अहमदनगर ११,नेवासा २, पारनेर २, पाथर्डी ४, राहाता १३, राहुरी ४, शेवगाव २, श्रीगोंदा ३, श्रीरामपूर १, संगमनेर २ आणि जामखेड येथे एक अशा ५० महाविद्यालयातुन सुरू होत असलेल्या या केंद्रांमधुन ८ हजार २५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाणार असल्याचे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी सांगितले.

यावेळी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सहा प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व विश्वकर्मा कार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रवेश नोंदविण्याचे आवाहन

या योजनेचा लाभ घेण्यासाठी १८ ते ४५ वयोगटातील इच्छुक युवक-युवतींनी संबंधित महविद्यालयांमध्ये रोजगार, स्वयंरोजगाराभिमुख अभ्यासक्रमांच्या कौशल्य विकास प्रशिक्षणाकरिता आपला प्रवेश नोंदवावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता

अल्पसंख्यांक समाजाच्या विकासासाठी निधीची भरीव तरतूद -पालकमंत्री अब्दुल सत्तार

छत्रपती संभाजीनगर -अल्पसंख्याक समाज घटकांच्या शैक्षणिक ,आर्थिक , व्यावसायिक विकासासाठी अल्पसंख्यांक विकास विभागाला ५०० कोटी रुपयाची भरीव आर्थिक तरतूद केली असून त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, लघुउद्योजकांना कर्ज पुरवठा व प्रशिक्षण देण्यात येईल, असे राज्याचे अल्पसंख्यांक व औकाफ, सहकार व पणन तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी आज येथे जाहीर केले.

हज हाऊस येथील सभागृहात मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाच्या मार्फत एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करण्यात आले. अल्पसंख्यांक आयुक्त मोहीन ताशिलदार, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री मगदूम ,यांच्यासह लाभार्थी, नागरिक यांची उपस्थिती होती.

अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण पैशा अभावी थांबू नये यासाठी कर्ज योजना ,परदेशामध्ये शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, उद्योग कर्जपुरवठा

,बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी कर्ज पुरवठा, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. याचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थि, नागरिक यांनी घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री सत्तार यांनी केले.

त्यांनी पुढे सांगितले की,एक दिवसीय प्रशिक्षणाच्या माध्यमातून अर्ज प्रक्रिया अर्जासाठी लागणारे कागदपत्रे याबाबतचे प्रशिक्षण व माहिती देण्यात येत आहे याचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील सर्व घटकांनी घ्यावा. अल्पसंख्याकांना शिक्षण देणाऱ्या मदरशांना देण्यात येणारे अनुदान दोन लाखावरून वाढ करून दहा लाख करण्याचा प्रस्ताव लवकरच शासनाकडे सादर करण्याचे निर्देश पालकमंत्री सत्तार यांनी दिले.

वक्फ बोर्ड मध्ये मदरशांची नोंदणी व आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी कर्ज घेतले असेल आणि या शिक्षणादरम्यान त्याचा मृत्यू झाला असेल तर त्याचे शैक्षणिक कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री सत्तार यांनी सांगितले.

पाच जिल्ह्यांमध्ये अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात वसतिगृहाची निर्मिती करण्यात येणार आहे.यात छत्रपती संभाजी नगर मध्ये नारेगाव , नाशिक जिल्हा मालेगाव, नागपूर ,मुंबई येथे वसतिगृह सुरू येणार असल्याचेही यावेळी सांगितले.

शेतकऱ्यांना मिळणारे अनुदानाची रक्कम कर्ज खात्यात वर्ग करू नका;-पालकमंत्री अब्दुल सत्तार यांचे बँकांना निर्देश

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ सप्टेंबर

शासनाकडून शेतकऱ्यांना खात्यात मिळणाऱ्या विविध योजनांच्या लाभाची रक्कम कर्जखात्यात वर्ग करु नका असा प्रकार आढळून आल्यास त्या बँकेविरुद्ध थेट कारवाई करण्यात येईल असा इशारा शुक्रवारी पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी जरंडी ता.सोयगाव येथील जिल्हा बँकेच्या भेटी दरम्यान दिला

सरकार शेतकऱ्यांना विविध लाभाच्या योजनांची रक्कम खात्यात वर्ग करत आहे लाडक्या बहिर्णीना मदत देत आहे परंतु सदरील बँका या योजनेची रक्कम कर्ज खात्यात अथवा थकबाकी मध्ये वर्ग करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहे असा प्रकार आढळून आल्यास सदर बँके विरुद्ध थेट कारवाई करण्यात येईल असा इशारा पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी जरंडी जिल्हा बँकेच्या भेटीत दिला आहे तसेच जरंडी जिल्हा बँकेचे शाखेची पाहणी केली असता,बँकेला नावाचे फलक आढळून आलेला नव्हता त्यामुळे चक्क पालकमंत्री सत्तार यांनी ही नेमकी कोणती बँक आहे असा सवाल व्यवस्थापक दिपक पाटील यांना करून सोमवारी बँकेच्या नावाचा फलक लावावा तसेच शासनाच्या विविध योजनांची जनजागृती करणारी माहिती दर्शनी फलकावर लावावी असे निर्देश व्यवस्थापक दिपक पाटील यांना दिले आहे.यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक श्रीराम चौधरी,सुधाकर चौधरी, समाधान तायडे,उत्तम गवळे,विष्णू वाघ,गटनेते अक्षय काळे नगरसेवक संतोष बोडखे,राजू दुतोंडे,दिलीप देसाई आदींची उपस्थिती होती.

सकल मराठा समाज बांधवांचे तहसीलसमोर धरणे आंदोलन

तभा वृत्तसेवा

कन्नड -दि.२१ सप्टेंबर - मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आंतरवली सराटी येथे उपोषणास बसलेले, संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल घेत मराठा समाजाचा सर्व मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी कन्नड शहर व तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी केली असुन शनिवार रोजी सकाळी दहा वाजे पासून धरणे आंदोलन सुरु केले आहे.

या संदर्भात तहसिलदार विद्याचरण कडवकर यांना दि.१९ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,१७ सप्टेंबर पासून मराठा आरक्षणासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे हे उपोषणास बसले आहेत. या आंदोलनास पाठींबा म्हणून आज दिनांक २१ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. पासून सकल मराठा समाज बांधवांचे तहसील कार्यालया समोर धरणे आंदोलना साठी बसले असुन दररोज सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत हे आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने मराठा समाज बांधव सहभागी झाले आहे

बांधकाम क्षेत्रातील दमदार कामगिरीबद्दल आयकॉन स्टीलचा केंद्रीय पोलाद मंत्री एच.डी.कुमारस्वामीकडून सन्मान

ऑल इंडिया स्टील असोशिएशन 'स्टीलएक्स' प्रदर्शन : आयकॉन स्टीलकडून उद्योगातील आव्हानांवर उपाय

मुंबई : आयकॉन स्टीलने ब्रँडिंग, मार्केटिंग आणि वितरण क्षेत्रामध्ये दमदार कामगिरी केली आहे. पुढील काळात देखील त्यांनी अशाच प्रकारे प्रगती साधावी अशा सदिच्छा देत आयकॉन स्टीलच्या कार्याचे कौतूक केंद्रीय पोलाद मंत्री एच.डी.कुमारस्वामी यांनी केले. ऑल इंडिया स्टील असोसिएशन कडून मुंबई येथे दि. १८ व १९ सप्टेंबर २०२४ रोजी आयोजित अधिवेशन आणि स्टीलएक्स प्रदर्शनाला त्यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

यावेळी प्रदर्शनातील आयकॉन स्टील दालनाचे फित कापून केंद्रीय पोलाद मंत्री एच.डी.कुमारस्वामी तसेच केंद्रीय अवजड उद्योग आणि पोलाद राज्यमंत्री भूपती राजू श्रीनिवास वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आयकॉन स्टीलचे संचालक उष्मेश राठी यांनी मंत्री एच.डी.कुमारस्वामी व राज्यमंत्री भूपती राजू श्रीनिवास वर्मा यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाप्रसंगी केंद्रीय पोलाद मंत्रालयाचे सचिव संदीप पौंडरीक, सहसचिव अभिजित नरेंद्र यांच्यासह ऑल इंडिया स्टील असोसिएशनचे अध्यक्ष योगेश मानधानी, सचिव कमल अग्रवाल, आयकॉन स्टीलचे संचालक श्रीनंदन राठी, अखिलेश राठी यांच्यासह स्टील उद्योगातील मान्यवरांची प्रमूख

आयकॉनने पुन्हा एकदा या क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट आणि व्यवसायातील सर्वात जलद आणि मजबूत वाढणारा ब्रँड असल्याचे सिद्ध केले आहे. याबद्दल आयकॉन स्टीलला या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. यामध्ये वितकर आणि टीमचा मोलाचा वाटा असून आयकॉन स्टीलचे व्यवस्थापकीय संचालक दिनेश राठी यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही राष्ट्र उभारणीसाठी वचनबद्ध आहे.

- उष्मेश राठी, संचालक, आयकॉन स्टील

उपस्थिती होती. स्टीलएक्स हे प्रदर्शन स्टील क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट तंत्रज्ञान, प्रमुख ब्रँड्सचे सर्वात मोठे आणि सर्वसमावेशक संमेलन मुंबई येथे भरविण्यात आले होते. स्टील उद्योग आणि त्यांच्याशी संबंधित

ऑल इंडिया स्टील असोसिएशनच्या वतीने आयोजित स्टीलएक्स प्रदर्शनामध्ये भारतीय स्टील उद्योगांसमोर असलेल्या विविध समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रामध्ये केंद्रीय पोलाद मंत्रालयाचे माजी सचिव संजय सिंग, आयकॉनचे संचालक उष्मेश राठी, श्रीनंदन राठी, यश गोयल, ध्रुव गोयल, श्रवण अग्रवाल, अमित हबंलानी, त्रिनाद कोतापल्ली, निरव पटेल आदी सहभागी झाले होते. यावेळी आयकॉनचे संचालक उष्मेश राठी व श्रीनंदन राठी यांनी स्टील उद्योगातील आव्हाने आणि त्यावरील उपाय यावर प्रकाश टाकला. या चर्चासत्रात त्यांनी उत्कृष्ठ मार्गदर्शन केल्याबद्दल त्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

उद्योगांनी मुंबईत झालेल्या 'स्टील एक्स २०२४' या प्रदर्शनामध्ये आपला सहभाग नोंदविला होता. यावेळी संपूर्ण देशभरातील स्टील उद्योजकांनी या प्रदर्शनाला हजेरी लावली होती. याप्रसंगी आयकॉन स्टीलच्या भरीव कामगिरी तसेच ब्रँडिंग, मार्केटिंग आणि वितरण क्षेत्रातील उत्कृष्ठ कार्याबद्दल केंद्रीय मंत्री आणि ऑल इंडिया स्टील असोसिएशन यांच्याकडून सन्मानित करण्यात आले.

सीएट १०० दशलक्षाव्या टायरचे उत्पादन

औरंगाबाद - सीएट या भारतातील आघाडीच्या टायर उत्पादक कंपनीने आज विक्रमी टप्पा गाठल्याचे जाहीर केले असून, कंपनीच्या नागपूर येथील प्लँटमधले १०० दशलक्षाव्या टायरचे उत्पादन करण्यात आले. ही कामगिरी सिएटची भारत, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर दुचाकी टायर्सना असलेली वाढती मागणी पूर्ण करण्यासाठीची बांधिलकी जपणारी आहे.सीएटच्या उत्पादन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष जयाशंकर कुरुप्पल या विक्रमी टप्प्याविषयी म्हणाले, 'नागपूर प्लँटमध्ये तयार करण्यात आलेले १०० दशलक्षावे टायर हे नावीन्य, शाश्वतता आणि देशांतर्गत, तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दुचाकी टायर्सना असलेली वाढती मागणी पूर्ण करण्यासाठीची बांधिलकी दर्शविणारी आहे.

महिंद्राचा नवा वीरो बाजारपेठेत दाखल

छत्रपती संभाजीनगर : युटिलिटी (विशिष्ट कामासाठी डिझाईन केलेली आणि कठीण रस्त्यांवर सहज प्रवास करू शकणारी) वाहने आणि ३.५ टनांपेक्षा कमी वजनाची एलसीव्ही वाहने बनवणारी भारतातील आघाडीची कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेडने महिंद्रा वीरो बाजारपेठेत दाखल केल्याची घोषणा केली आहे, याची किंमत ७.९९ लाख रुपयांपासून पुढे आहे. ३.५ टनांपेक्षा कमी वजनाच्या एलसीव्ही वाहनांच्या सेगमेंटमध्ये क्रांती घडवून आणण्यासाठी डिझाईन केलेला वीरो श्रेणीतील सर्वोत्तम मायलेज, त्यामुळे होणारी भरपूर बचत, दमदार इंजिन पर्यायांसह अतुलनीय कामगिरी, उद्योगक्षेत्रात सर्वोत्तम सुरक्षा वैशिष्ट्ये, वाहनातून प्रवास करणाऱ्या व्यक्तींसाठी अधिक प्रगत सुरक्षा आणि केबिनमध्ये प्रीमियम अनुभव या सर्वांचा लाभ महिंद्रा वीरोमध्ये घेता येणार आहे.

ॲक्सिस बँकेच्या बरगंडी प्रायव्हेटचा विस्तार

छत्रपती संभाजीनगर : ॲक्सिस बँकेचा खाजगी बँकिंग व्यवसाय बरगंडी प्रायव्हेटने आपली संपत्ती व्यवस्थापन सेवा १५ नवीन शहरांमध्ये विस्तारित करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे संपूर्ण भारतातील एकूण ४२ शहरांमध्ये आपले स्थान विस्तारले आहे. नवीन ठिकाणांमध्ये सुरुवातीला भुवनेश्वर, पटणा, रायपूर, आग्रा, गाझियाबाद, जोधपूर, उदयपूर, जालंधर, मेरठ, बेळगाव, कोझिकोड, तिरुवनंतपुरम, औरंगाबाद, नागपूर आणि गांधीधाम यांचा समावेश आहे. या बाजारपेठांमध्ये गुंतवणुकीत लक्षणीय वाढ झाली असून, त्यामध्ये बचत आणि मुदत ठेवीमध्ये १ लाख कोटी रुपयांचा टप्पा पार झाला आहे*. आपल्या कौशल्य, तंत्रज्ञान आणि डेटा विश्लेषणाचा लाभ घेत, बरगंडी प्रायव्हेटने या उभरत्या भौगोलिक प्रदेशांमध्ये समृद्ध ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी वैयक्तिकृत उपाय प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

संपूर्ण पीक पोषण-महाधन ॲग्रीटेक लिमिटेड

जमिनीच्या शाश्वत उत्पादकतेसाठी मुख्यतः पोषक तत्वांचा पुरेसा आणि संतुलित प्रमाण वापर करणे आवश्यक असते , ज्यामुळे उच्च पोषक प्रतिसाद देणाऱ्या ऊस पिकाची योग्य वाढ होते आणि शेवटी अधिक उत्पादन मिळते. जमिनीची शाश्वतता भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मांसारख्या प्राकृतिक सुपीकता ठरविणाऱ्या घटकांवर अवलंबून असते. वापरलेल्या खतांच्या मात्रेची कार्यक्षमता नायट्रोजन, फॉस्फरस, पोटॅशियम, सेंद्रिय सामग्री, सूक्ष्म पोषक घटक आणि पाण्याच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. हे सर्व घटक सध्या अतिशय विषम (जास्त किंवा कमी) प्रमाणात वापरले जात होते आणि वापरली जात आहेत ज्यामुळे जमिनीत पोषक तत्वांची कमतरता दिसून येत आहे आणि परिणामी जमिनीचा ऱ्हास होत चाललेला आहे. मातीतील किमान पोषक तत्त्वांचे प्रमाण पुरेशा प्रमाणात न राखले गेल्याने, पोषक तत्त्वांची कमतरता, रोपांची कमजोर वाढ आणि कृषि उत्पादकतेत घट होऊ शकते. म्हणून, माती ही एक मर्यादित आणि अनुतनीकरणीय साधन आहे, जिचे वर्तमान आणि भविष्यातील पिढ्यांच्या फायद्यासाठी संरक्षण आणि व्यवस्थापन जबाबदारीने करणे आवश्यक आहे.

मोबिल कडून 'इंडियन रेसिंग फेस्टिवल २०२४'चे आयोजन

छत्रपती संभाजीनगर : मोबिल या ऑटोमोटिव्ह ल्युब्रिकण्ट्समधील अग्रणी कंपनीने ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी चेन्नई फॉर्म्युला रेसिंग सर्किट येथे 'इंडियन रेसिंग फेस्टिवल २०२४'दरम्यान चेन्नईमध्ये भारतातील पहिल्या नाइट स्ट्रीट रेससाठी रेसिंग प्रमोशन्स प्रायव्हेट लिमिटेड (आरपीपीएल) सोबत सहयोग केला. या उल्लेखनीय इव्हेण्टसह मोबिलने सलग तिसऱ्या वर्षी इंडियन रेसिंग फेस्टिवलसोबत सहयोग केला, ज्यामधून गती, कौशल्य, तंत्रज्ञान आणि कार्यक्षमतेचे भव्य संयोजन दिसून येते.इंडियन रेसिंग लीग आणि फॉर्म्युला ४ चॅम्पियनशीपसाठी ऑफिशियल ल्युब्रिकण्ट पार्टनर असलेल्या मोबिल ने भारतीय मोटरस्पोर्ट्सला प्रगत करण्याप्रती आपल्या कटिबद्धतेला दाखवले, जेथे कंपनीचे 'परफॉर्मन्स बाय मोबिल १'वर लक्ष केंद्रित आहे. आरपीपीएलद्वारे आयोजित करण्यात आलेल्या फेस्टिवलअंतर्गत संपूर्ण नोव्हेंबर २०२४ महिन्यामध्ये देशभरात पाच आकर्षक फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या इव्हेण्टने मोबिल १ च्या भारतातील ५० वर्षांच्या उपस्थितीला देखील साजरे केले.

'अश्व' प्रीमियर मेटल क्रेडिट कार्डचे अनावरण

मुंबई : अत्याधुनिक आर्थिक समाधानांमध्ये अग्रणी म्हणून, आईडीएफसी फर्स्ट बँकेने अत्याधुनिक, आधुनिक ग्राहकांसाठी सर्वात अलीकडील उत्पादन, अश्व क्रेडिट कार्ड लॉन्च करण्याची घोषणा केली आहे. व्हिसा-द्वारे समर्थित अश्व क्रेडिट कार्ड हे उदयोन्मुख भारताच्या महत्त्वाकांक्षा आणि उत्कटतेचा उत्सव आहे. आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशात खोलवर रुजलेले, हे कार्ड भारतीय वारशाच्या सौंदर्यासह आधुनिक जीवनशैलीच्या अभिजाततेचे परिपूर्ण मिश्रण सादर करते, जे भारताला हृदयाशी धरून ठेवणारे आणि ते जिथे जातील तिथे त्याचे सार आपल्यासोबत घेऊन जाणाऱ्या लोकांसाठी डिझाइन केलेले आहे. उत्कृष्ट धातूपासून बनवलेले, अश्व क्रेडिट कार्ड कार्डधारकांना भारतीय वारसा आणि धातूच्या अत्याधुनिकतेचे मिश्रण देते. कमी फॉरेक्स चार्जेस आणि एअरपोर्ट लाउंजमध्ये मोफत प्रवेश यासारख्या लक्झरी प्रवासाच्या फायद्यांनी भरलेले, हे समृद्ध तरुण शोधकांसाठी एक अपरिहार्य सहकारी बनले आहे.

आईवीएफ यशाचे दर वाढले: इच्छुक पालकांसाठी याचा अर्थ काय

छत्रपती संभाजीनगर - वंध्यत्वाचा सामना करणाऱ्या जोडप्यांसाठी लक्षणीय वाढ म्हणून, अलीकडील डेटावरून असे दिसून आले आहे की भारतातील इन विट्रो फर्टिलायझेशन (आईवीएफ) साठी यशाचा दर अभूतपूर्व पातळीवर पोहोचला आहे. ही प्रगती सहाय्यक पुनरुत्पादक तंत्रज्ञानाच्या लँडस्केपला आकार देत आहे आणि अनेक इच्छुक पालकांना नवीन आशा देते. आयव्हीएफ तंत्रज्ञानातील अलीकडील प्रगतीने या वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुधारित भ्रूण संवर्धन तंत्र, वर्धित अनुवांशिक तपासणी आणि वैयक्तिक उपचार योजना या सर्वांनी उच्च यश दरात योगदान दिले आहे. अग्रगण्य प्रजनन क्लिनिकमधील डेटा दर्शवितो की आईवीएफ प्रक्रियेचा यशाचा दर आता ३५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या महिलांसाठी ५०% पेक्षा जास्त झाला आहे, जो मागील वर्षांच्या तुलनेत लक्षणीय सुधारणा दर्शवितो.

पहिले क्रिस्पी व्हेजी बर्गर लॉंच

नाशिक : या सणासुदीच्या हंगामात, वेस्टलाइफ फूडवर्ल्डच्या मालकीच्या आणि संचालित मॅकडोनाल्ड्स इंडिया ने मॅकक्रिस्पी चिकन बर्गर आणि क्रिस्पी व्हेजी बर्गर या दोन प्रीमियम बर्गरची घोषणा केली आहे. जागतिक स्तरावर लोकप्रिय मॅकक्रिस्पी चिकन बर्गर आणि अनोख्या पद्धतीने तयार केलेले नवीन क्रिस्पी व्हेजी बर्गर भारतात त्यांचे बहुप्रतिक्षित पदार्पण करत आहेत. मॅकक्रिस्पी चिकन बर्गरमध्ये एक पूर्णपणे स्नायू असलेली चिकन फिलेट पॅटी आहे, जी प्रीमियम वॉटर-कट ग्लेझ्ड बन, ताजे लेट्युस आणि क्रीमी मिरपूड मेयो सॉसवर सर्व्ह केली जाते. हा बर्गर एक उत्कृष्ट क्रंच, उत्कृष्ट चिकन अनुभव देतो जो बर्गर श्रेणीमध्ये एक नवीन बेंचमार्क सेट करेल.

फारोळा येथील हजरत शहानुर मिया दर्गा संदल निमित्त मिरवणुक

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ सप्टेंबर.पैठण तालुक्यातील फारोळा येथील हजरत शहानुर मिया दर्गा संदल निमित्त दि १९ रोजी सायंकाळी मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली ,मागील पारंपरिक पद्धतीने चालत आलेली परंपरा असुन दरवर्षीप्रमाणे या वर्षी हजरत शाहनूर मिया दर्गा संदल मिरवणूक घोड्यावर चादर सवार करुण मिरवणूक या पद्धतीने दर्गा ची चादर घेऊन मिरवणूक काढण्यात आली. दर्गा वर चादर चढवण्याची पारंपारिक पद्धत आहे यावेळी नागरिक व पोलीस

अधिकारी व कर्मचारी व पत्रकार यांचाही समावेश होता,हजरत शहानुर मिया दर्गा संदल मिरवणूक काढून साजरी करण्यात आली याठिकाणी भाविक भक्तांसाठी गोड भात प्रसाद करण्यात आला होता यावेळी पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.याप्रसंगी सहायक पोलीस निरीक्षक नारायण गिते, सरपंच सलीम पठाण, रविंद्र गोरे,विष्णू पोपळघट, संजू धुमाळ, सहाय्यक फौजदार महादेव निकाळजे, पो कॉ मगर,पत्रकार अरुण देविदास,हसन चाऊस, रविंद्र गायकवाड, गणेश सोनवणे, अली भाई इनामदार, अलिम शेख,आदींसह गावातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी संदल मिरवणुकीचे आयोजन समिती अध्यक्ष- अलीम शेख , उपाध्यक्ष- आरिफ पठाण , असलम शेख , सचिव-मुन्ना पठान ,अमीर पठाण , सदस्य आझाद शेख ,फरमान पठाण ,कलीम शेख , बादशाह सय्यद ,अंसार पठाण ,इरफान सय्यद आदींसह फारोळा गावातील सर्व नवतरुणांनी संदल मिरवणुक पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

युथ मूव्हमेंट आयोजित रक्तदान शिबिराला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ :- नेहरू चौक, पैठण येथे आयोजित. रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रेषित मुहम्मद यांनी सांगितले आहे की तुमच्यामध्ये सर्वोत्तम तो आहे. जर कोणी एका व्यक्तीचे प्राण वाचविले तर त्याने जणू समस्त मानवजातीचे प्राण वाचविले. ही शिकवण समोर ठेवून युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र पैठण युनिट तर्फे सदरील रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास शहरातील नामांकित डॉक्टर, पोलीस निरीक्षक, राजकीय व्यक्तींनी भेटी दिली. या वेळी १४४ रक्तदात्यांनी

रक्तदान केले. कार्यक्रम यशस्वी करण्यात आमेर मलिक, अध्यक्ष युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्रचे, हूझैफ बोहरी, जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष जाकिर कट्यारे, इस्माईल नगरकर, मुखीम कट्यारे, इंझामाम शेख, ज़ाकिर अम्बेकर, फैसल यमीन अब्दुर्रहेमान शेख, तालेब गिराम आसेफ़ गाज़ी,आदिल कटयारे, सोहैल पठान,सरफराज़ शेख,नसीर कटयारे,अदनान कट यारे,नूररुद्दीन ,मतीन पटेल,मुजाहिद कटयारे मुजक्कीर अंबेकर, असलम पठान, शाहनवाज़ शेख,अज्जू कटयारे फैज़ान अम्बेकर,रेहान अम्बेकर,अमान नगरकर,हुज़ेफ फूलमरकर, इरफान बागवान, इमरान, असिफ, ड. इम्रान आरिफ कुरैशी, सय्यद बादशाह, आमेर मलिक आदींनी परिश्रम घेतले.

सूक्ष्म उद्योजकांसाठी 'लोकल टू ग्लोबल वर्कशॉप'

छत्रपती संभाजीनगर २० सप्टेंबर २०२४: एबी इनबेव इंडिया डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क (ओएनडीसी) मध्ये सामील झाली आहे. स्वाधार कार्यक्रमांतर्गत भारतातील सूक्ष्म-उद्योजकांद्वारे चालवल्या जाणाऱ्या व्यवसायांचे सक्षमीकरण करण्याचे उद्दिष्ट आहे. हे सूक्ष्म उद्योजक त्या समुदायांमध्ये काम करतात जिथे कंपनी आपली सेवा प्रदान करते. कंपनीने उद्यमवेलच्या सहकार्याने आणि सत्वाच्या

भागीदारीत शंभाजीनगरमध्ये 'लोकल टू ग्लोबल वर्कशॉप ऑन ओएनडीसी' या कार्यक्रमाची सुरुवात केली.

या कार्यशाळेत ६० हून अधिक सूक्ष्म उद्योजकांनी ओएनडीसी प्लॅटफॉर्मच्या मदतीने त्यांचा व्यवसाय वाढविण्याबाबत महत्त्वाची माहिती मिळवली. यामध्ये शेतकरी उत्पादक संस्था (एफपोओ), स्वयं-सहायता गट (एसएचजी), हस्तकला आणि खाद्य व्यवसायांसह विविध क्षेत्रातील ६८ विक्रेते (४० पुरुष आणि २८ महिला) सहभागी झाले होते. सत्रांमध्ये ओएनडीसीचा परिचय, मार्केट ऍक्सेस आणि रेव्हेन्यू ग्रोथसाठी ओपन नेटवर्क इकोसिस्टम आणि ओएनडीसी वापरण्याबाबत तपशीलवार मार्गदर्शन, वास्तविक यशोगाथा आणि ऑनलाइन उत्पादन व्हिज्युअल वाढवणे यासारख्या विविध विषयांचा समावेश करण्यात आला.

'त्या' शेतकर्यांच्या कृषी पंपांचे वीज बील माफ करा : आ.सतीश चव्हाण यांची मागणी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२० सप्टेंबर : राज्य सरकारने राज्यातील राज्यातील ७.५एच.पी.पर्यंतच्या शेतकर्यांच्या कृषी पंपांना मोफत वीज पुरवठा करण्याची घोषणा केली. याचा कालावधी एप्रिल २०२४ पासून ग्राह्य धरण्यात आला आहे. मात्र असंख्य शेतकर्यांकडे ३१ मार्च २०२४ पूर्वीचे कृषी पंपांचे वीज बील अद्यापही थकीत असून ते वीज बील देखील माफ करावे अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आज (दि.२०) निवेदनाव्दारे केली आहे.

यासंदर्भात आमदार सतीश चव्हाण यांनी मु'यमंत्री, उपमु'यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २८ जून २०२४ रोजी पावसाळी अधिवेशनात महायुती सरकारने राज्यातील ७.५ एच.पी.पर्यंतच्या शेतकर्यांच्या कृषी पंपांना मोफत वीज पुरवठा करण्याची घोषणा केली. २५ जुलै २०२४ रोजी ऊर्जा विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय देखील निर्गमित केला. जागतिक हवामान बदल आणि अनियमित पर्जन्यामुळे राज्यातील कृषी व्यवसायावर दुष्परिणाम झाला असून शेती करणार्या शेतकर्यांवर नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे. त्यामुळे राज्यातील शेतकरी अडचणीत

सापडला. अशा अडचणीत सापडलेल्या बळीराजाला दिलासा देणारी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना महायुती सरकारने सुरू केली. एप्रिल २०२४ ते मार्च २०२९ पर्यंत म्हणजे पाच वर्षासाठी सदरील योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मराठवाड्याची अर्थव्यवस्था ही प्रामु'याने कृषीवर आधारित आहे. येथील शेतकरी खरीप व रब्बी अशा दोन्ही हंगामात विविध पिकांची लागवड करतात. मात्र मागील दोन-तीन वर्षांपासून मराठवाड्यातील शेतकरी नैसर्गिक संकटाला तोंड देत असल्याने ते आर्थिक संकटात सापडले आहेत. असंख्य शेतकर्यांकडे ३१मार्च २०२४पूर्वीचे कृषी पंपांचे वीज बील अद्यापही थकीत आहेत. त्यामुळे हे वीज बील भरायचे तरी कसे? असा प्रश्न शेतकर्यांमधून उपस्थित होत आहे. २५ जुलै २०२४रोजीच्या शासन निर्णयामध्ये ३१ मार्च २०२४पूर्वीच्या वीज बीलाचा उल्लेख नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी निवेदनाव्दारे निदर्शनास आणून दिले असून २८ जून २०२४ रोजी जाहीर केल्याप्रमाणे ३१ मार्च २०२४पूर्वीचे वीज बील देखील माफ करून शेतकर्यांना शुन्य रूपये वीज बील पाठवावे अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी केली आहे.

रिटायरमेंटमध्ये कुटुंबाच्या सांस्कृतिक अपेक्षा विकसित करण्याची आवश्यकता का ?

पुणे : वर्षांनूवर्षांपासून भारतीय समाजाला रीति-रिवाज व परंपरेच्या चष्म्यातून पाहिले जात आहे. या गोष्टीने समाजाला एक विशिष्ट ओळख दिली आहे. सांस्कृतिकदृष्ट्या भारतीय परिवार एक-दूसऱ्यांशी जुळले असून, पिढ्यानपिढ्या या परंपरांचे पालन करीत आहे. उल्लेखनीय म्हणजे, आपल्या येथे मुले स्वतःच्या पायावर उभे होईपर्यंत माता-पिता त्यांची देखभाल करतात. आणि मुलेही म्हातारपणात त्यांच्या आईवडिलांची तितकीच देखभाल करतात. या दोन्हीही भूमिका पाहून निश्चितच मनाला खूप आनंद होतो.

बंधन एएमसीचे सेल्स अँड डिस्ट्रीब्यूशन हेड गौरव परीजा यांचे म्हणणे आहे की, जुन्या काळापासून सुरू असलेल्या या परंपरामुळे भारतात खूप कमी लोकांच्या मनात रिटायरमेंटची योजना बनविण्याचा विचार येतो. मात्र जसजसा काळ बदलत आहे, तसतशी भारतीयांची जीवनशैलीही बदलत चालली आहे. परंपरेनुसार, म्हाताऱ्या आईवडिलांची देखभाल करणे, हे मुलांचे नैतिक कर्तव्य आहे. ही प्रक्रिया साधारणपणे संयुक्त परिवारात दिसून यायच्या, जिथे अनेक पिढ्या एकत्र राहात होत्या. त्यामुळे मुलांचे पालनपोषण चांगल्या प्रकारे होत असे. आणि म्हाताऱ्यांचीही योग्य देखभाल व सहायता होत होती. परंतु आता परिस्थिती बदलली आहे. एकेकाळी ज्येष्ठांसाठी सुरक्षा कवच असलेली पारंपरिक संयुक्त परिवार पद्धती आता एकल परिवाराकडे वाटचाल करीत आहे. या बदलासोबतच वाढता खर्च आणि वाढत्या सरासरी वयामुळे वित्तीय गुंतवणूकीचा विचार पुढे आलेला आहे. त्यामुळे आता मजबूत रिटायरमेंट योजनेची तत्काळ गरज बनत चालली आहे.

परीजा म्हणाले, २०२४ पर्यंत पाच पैकी दोन भारतीयांनी अजूनपर्यंत रिटायरमेंट स्कीम सुरू केली नाही. तसेच ६१ टक्के लोकांच्या मनात त्यांची बचत दहा वर्षांच्या आत संपणार असल्याची भीती आहे. ही परिस्थिती निश्चितच गंभीर व चिंताजनक असून, विचार करायला भाग पाडणारी आहे. भारतात २०३१ पर्यंत रिटायर लोकांची जनसंख्या ४१ टक्क्यांपर्यंत वाढण्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. आजच्या घडीला युवापिढी अन्य गुंतवणूकीच्या तुलनेत रिटायरमेंट प्लानिंगकडे दुर्लक्ष करीत आहेत. ते दूरचा किंवा भविष्याचा गंभीर विचार करताना दिसत नाहीत. कार किंवा घर खरेदी करण्यासारखे अन्य तत्काल वित्तीय लक्ष्य पूर्ण करण्यात ते सतत व्यस्त असतात. आपली वर्तमान कमाई एकाचवेळी तत्काळ वित्तीय लक्ष्य आणि रिटायरमेंट बचत पूर्ण करण्यात मदत करीत नसल्याची युवापिढीची भावना आहे. याच कारणांमुळे म्हातारपणीच्या गुंतवणूकीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.''

ते म्हणाले, जेव्हा रिटायरमेंट प्लानिंगची गोष्ट येते, तेव्हा वेळेनुसार छोटे परंतु नियमित योगदानही मोठा फायदा मिळवून देऊ शकते. ही बाब कमाई करणारे युवा व मध्यम वयोगटातील लोकांना समजून घेण्याची आवश्यकता आहे. आजच्या घडीला अनेक विश्वसनीय वित्तीय सल्लागार व प्रतिष्ठित वित्तीय संस्थान आहेत, जे अशाप्रकारच्या सेवा प्रदान करतात. त्यांचा फायदा घेऊन रिटायरमेंटनंतर स्थिर वित्तीय भविष्य सुरक्षित करण्यासाठी चांगली गुंतवणूक योजना बनविता येऊ शकते. आपल्या देशात मुले रिटायरमेंटमध्ये मदत करतील, असा रिटायरमेंट प्लानिंगसंदर्भात उदासीन दृष्टिकोणाचे एक प्रमुख कारण आहे. मात्र अलीकडच्या काळात या अपेक्षा वेगाने अवास्तविक होत आहेत. कारण पारिवारिक संरचना विकसित होत असून, खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे उज्जवल भविष्यासाठी गुंतवणूकीसंदर्भात योग्यवेळी अचूक निर्णय घेणे अतिशय आवश्यक आहे.

केसरबाई गव्हाडे यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ सप्टेंबर : सोयगाव तालुक्यातील घोसला येथील केसरबाई केशव गव्हांडे(वय.९७) यांचे शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता वृद्धपकाळाने निधन झाले.त्यांचेवर शनिवारी दुपारी एक वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.ते मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान पाटील गव्हांडे यांच्या त्या आजी होत.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर
कि.दि.अर्ज क्र. ३८८/२०२४
पु.ता. २५/१०/२०२४

अर्जदार : १) गोकुळ गिनदेव ठवाळ, वय ३३ वर्षे, धंदा शेती, रा. नवाबपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) कैलास गिनदेव ठवाळ, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. नवाबपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) वैशाली भ्र. रोहिदास कडवे, वय ३६ वर्षे, धंदा. गृहिणी, रा. प्लॉट नं.३१ कोमल नगर, पडेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर ४) गिनदेव उर्फ गिननदेव कारभारी ठवाळ, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. नवाबपुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण १- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ए. पारधे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.३ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.४ हे अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडील आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई व अर्जदार क्र.४ ची पत्नी नामे छायाबाई गिनदेव ठवाळ ह्या मौजे नवाबपुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक २९/०४/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे. मयत छायाबाई गिनदेव ठवाळ यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदारनसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/९/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापूर.

जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद सिव्हिल एम.ए. क्र. १० /२०२३

अर्जदार : ज्ञानेश्वर तुकाराम वाल्हेकर, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी, रा. मांडवा ता. गंगापुर जि. औरंगाबाद ह.मु. ४-७-४०, तोडकर यांचा वाडा, फकीरवाडी, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- तुकाराम सखाराम वाल्हेकर, वय ७३ वर्षे, धंदा. निरंक, रा. रहाटगाव ता. पैठण जि. औरंगाबाद

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.पी. लबडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, गैरअर्जदार हे अर्जदाराचे वडील असुन ते दोघे वर नमुद केलेल्या पत्यावर राहत आहे. अर्जदाराची आई व गैरअर्जदाराची पत्नी नामे जानकाबाई तुकाराम वाल्हेकर या मांडवा ता. गंगापुर येथील रहिवाशी होत्या व त्यांचे माहेर देखील मांडवा ता. गंगापुर येथीलच होते, त्या दिनांक १९/१२/२०१३ रोजी मयत झालेल्या असुन मयत जानकाबाई तुकाराम वाल्हेकर यांना अर्जदार व गैरअर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत जानकाबाई तुकाराम वाल्हेकर यांना अन्य कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप- उजर लक्षात घेतला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदारांच्या हकात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आल दिनांक २१/९/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापूर

जाहीर प्रगटन

मा.दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद
Civil Misc. Application No. 343/2024

अर्जदार : १. शकुंतलाबाई भ्र. कचरू म्हस्के, २. बाबासाहेब पिता कचरू म्हस्के, ३. शोभाबाई भ्र.अशोक जाधव, रा. बोरगाव, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ४. वंदना भ्र.किशोर त्रिभुवन, ५. संगीता पिता कचरू म्हस्के, ६. उज्वला भ्र.संजय जाधव, रा.नांदेडा, ता.गंगापुर जि. औरंगाबाद ७. ज्योती भ्र.गोकुळ बागुल, वरील अर्जदार नं. १, २, ४, ५ व ७ रा. गवळीशिवरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

प्रतिपक्षी : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी कचरू धोंडीबा म्हस्के यांचा दि.१०/०६/२०१५ रोजी मौजे गवळीशिवरा, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.एस. पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे सायटेशन नोटीस माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे. दि.२०/०९/२०२४

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

जाहीर प्रगटन

मा दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात

सिव्हिल एम ए क्र. ३८०/२०२४. पूता १७/१०/२०२४

अर्जदार : १) सावित्रीबाई केरु वंजारे, वय ७५ वर्ष, धंदा शेती रा देवळी छत्रपती संभाजी नगर. २) म्हसू केरुज वंजारे, वय ५० वर्ष, धंदा शेती, रा देवळी, ता

जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा कडकडीत बंद

(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ सप्टेंबर

मराठा आरक्षण संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी अंतरवली सराटी येथे सहाव्यांदा आमरण उपोषण सुरू केले असुन उपोषणाचा ५ वा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली आहे.

सरकारकडून वारंवार मराठा आरक्षण बाबतीत शब्द देऊनही चालढकल करण्यात येत असुन मुख्यमंत्री, मंत्रीमंडळ दिलेल्या शब्दाला जागत नाहीत. त्यामुळे सगेसोयरे अधिसुचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद, मुंबई आणि सातारा गॅझेट लागु करा, अंतरवली सराटीसह राज्यात मराठा आंदोलनाच्या निमित्ताने दाखल गुन्हे मागे घेण्यात यावेत. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबातील सदस्यांना शासकीय नोकरीत सामावून घ्यावे.मराठा आणि कुणबी एकच असुन अध्यादेश पारित करून कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे या मागण्यांसाठी उपोषण सुरू केले असून उपोषणाचा आज ५ वा दिवस आहे. जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली असून त्यांच्या समर्थनार्थ बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. त्यानुसार आज बीड जिल्ह्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. बीड येथील सर्व व्यापारी बांधवांनी दुकाने बंद ठेवून उत्स्फूर्तपणे बंदमध्ये सहभाग घेतला.

शिवाजी महाराज चौक येथे याठिकाणी एकत्र जमा होत जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ लढेंगे जितेंगें हम सब जरांगे ,एक मराठा लाख मराठा जरांगे पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है म्हणत घोषणाबाजी केली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांना मराठा समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.यावेळी पोलिसांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी शहरात ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त लावला होता.

राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना खा.बजरंग सोनवणेंनी पाठविले पत्र; मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्याची केली मागणी

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ सप्टेंबर

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, अंतरवाली सराटीत (दि.१७) पासून आमरण उपोषणास बसले आहेत.त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. त्यामुळे राज्यातील कोटी मराठ्यांचा आवाज असलेले संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी तातडीने हालचाली कराव्यात, अशा मागणीचे पत्र बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना शनिवारी (दि.२१)दिले आहे. मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांची खा.बजरंग सोनवणे यांनी अंतरवाली सराटीत जावून भेट घेत, त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करुन राज्यपाल व मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून उपोषण सोडविण्याची मागणी केली.

मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील, जीवाची परवा न करता, समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी संविधानिक आणि शांततेच्या मार्गाने आंदोलन करत आलेले आहेत. समाजाला आरक्षण मिळवून दिल्याशिवाय आता माघार नाही, भले जीव गेला तरी चालेल. अशी भूमिका मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेली आहे. मराठा समाजाला त्यांचा शब्द अंतिम असून ते मराठा समाजाच्या काळजाचा विषय आहेत. राज्य सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाकडे कदापिही दुर्लक्ष करता कामा नये. संविधानिक मार्गाने रास्त मागणी घेऊन आंदोलन सुरू असेल तर सरकारची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे की, जातीने या आंदोलनाकडे लक्ष दिले पाहिजे. आमरण उपोषण सुरू होऊन एक आठवडा होत आला आहे. मात्र अद्यापही सरकारने पावले उचललेली नाहीत. ही बाब चिंतेची आहे. त्यामुळे राज्यपाल महोदय आणि मुख्यमंत्री यांनी जराही विलंब न करता, तातडीने उपोषण सोडविण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी दिलेल्या पत्रात केली आहे.

पाटील आमच्या अस्मितेचा विषय

अंतरवाली सराटीत मराठ आरक्षणाचे संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आमरण उपोषणास बसले आहेत. बीड जिल्ह्याचे खा.बजरंग सोनवणे यांनी त्यांची भेट घेऊन विचारपूस केली. यावेळी ते म्हणाले पाटील कोटी मराठी तुमच्या सोबत आहेत. समाजासाठी तुम्ही आज जीवाची परवा न करता उपोषण करत आहात. तुमचा हा लढा आमच्या मुलाबाळांच्या भवितव्यासाठी एक नवी पहाट असणार आहे. त्यामुळे तातडीने मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाची दखल घ्यावी.कारण मनोज जरांगे पाटील मराठा समाजाच्या अस्मितेचा विषय आहे. अशा लोकभावना खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केल्या.

मराठवाडा जनता विकास परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्ष दिलीप खिस्ती, कोषाध्यक्ष अतुल कुलकर्णी व सल्लागार म्हणून सर्वोत्तम गावरस्कर यांची निवड

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ सप्टेंबर

मराठवाडा जनता विकास परिषदेच्या जिल्हा उपाध्यक्ष दिलीप खिस्ती, कोषाध्यक्ष अतुल कुलकर्णी व सल्लागार म्हणून सर्वोत्तम गावरस्कर यांची निवड झाली. तसेच महिला प्रतिनिधी म्हणून सौ.मनिषा शितोळे यांची निवड झाली.

कार्यकारिणीची निवड करण्यात आली. श्री.राजेंद्र होळकर, मंगेश निटुरकर, बीड प्राचार्य डॉ.एच.थोरात, डॉ.नरेंद काळे अंबाजोगाई, भास्करराव सरदेशमुख आष्टी गदळे केज, विजय जोशी पाटोदा, प्रदिप जोशी गेवराई, सुहास देशमुख माजलगाव यांची निवड झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगवान, होते. बैठकीस माजी आमदार डी.के.देशमुख, जिल्हा सचिव शिरीष देशमुख, प्रदेश सचिव सुमंत गायकवाड हे उपस्थित होते.

नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब-डॉ पाटंगणकर

सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२१ सप्टेंबर

नैतिकतेचे अध:पतन होत आहे. मनावर नियंत्रण नैतिकता ठेवते. बाहेरच्यापेक्षा अंतरंग महत्वाचे आहे. गैरवर्तणुकी बद्दल भीती असावी. नैतिकतेची शिकवण घरातून द्यावी. नैतिकता ही सांगण्याची नाहीतर आचरणात आणण्याची बाब आहे असे प्रतिपादन डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेत तिसरे पुष्पगुंफताना व्यक्त केले.

सुंदरराव सोळंके यांच्या जयंती निमित्ताने सुंदरराव सोळंके महाविद्यालयात तीन दिवसीय व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विद्यासागर पाटंगणकर यांनी गुंफले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यप्रकाश रुद्रवार होते. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रा. स्नेहल पाठक, सौ. रेणुका पाटंगणकर, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, मराठी विभागप्रमुख डॉ.भाऊसाहेब राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वर्तमान समाज व्यवस्था व नैतिकता या विषयावर बोलताना डॉ.पाटंगणकर म्हणाले की, शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होत आहे तसेच रामाच्या नावाचा जप करून भोंदू बाबा लोकांना भुलवतात. काही आश्रम हे शोषणाचे केंद्र होत आहेत. अशामुळे नैतिकतेची अध:पतन होत आहे. यावर बुद्धिवंतांनी नीतिमत्तेचा अंकुश ठेवावा असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. जी. के. सानप यांनी विद्यार्थ्यांना नीतिमत्ता विषयी समयोचित मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. ए. कव्हळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर कुंडकर यांनी केले तर आभार प्रा. अशोक दौंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक, प्राध्यापक,कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

कुंबेफळ ग्रामपंचायत तालुक्यात प्रथम आणि जिल्ह्यात तृतीय

संत गाडगे बाबा स्वच्छता अभियानात मिळवले ३ लाख ६० हजार रू चे बक्षीस

तभा वृत्तसेवा
केज दि.२१ सप्टेंबर

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान २०२३-२४* अंतर्गत *राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत* *कुंबेफळ ग्रामपंचायत* ने जिल्हा स्तरीय *तृतीय क्रमांक* पटकावला आहे.

जिल्हास्तरीय तपासणीसाठी प्रत्येक जि प गटातुन एक गाव निवडले जाते व त्यापैकी प्रत्येक तालुक्यातून एका गावाची निवड केली जाते.

जिल्हास्तरीय तपासणीसाठी *केज तालुक्यातून* आपल्या *कुंबेफळ* गावाची निवड झालेली होती सदर स्पर्धेच्या अनुषंगाने दि १९ जुलै रोजी *जिल्हास्तरीय पथका मार्फत तपासणी करण्यात आली होती*

बीड जिल्हा परिषदेच्या *मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती संगितादेवी पाटील* मॅडम यांनी नुकताच या स्पर्धेचा निकाल घोषित केला आहे. यामध्ये *कुंबेफळ ला जिल्ह्यातून तृतीय क्रमांक* मिळाला आहे.

आता लवकरच या स्पर्धेचा बक्षिस वितरण सोहळा संपन्न होईल अन् तो दिवस कुंबेफळच्या प्रत्येक नागरिकांसाठी अभिमानाचा असेल.

अतिशय कमी वेळेत या स्पर्धेच्या तयारी साठी गावातील सर्व नागरिक, प्रतिष्ठित मंडळी, ग्रा प चे सर्व पदाधिकारी व कर्मचारी, गावातील तरुण मंडळी, सामाजिक कार्यकर्ते, गावातील दोन्ही शाळेचे शिक्षकवृंद व विद्यार्थी व अंगणवाडी सेविका, आरोग्य उपकेंद्राचे सर्व कर्मचारी व आशाताई तसेच गावाशी संबंधित सर्व कर्मचारी यांनी चांगल्या प्रकारे सहकार्य केल्यानेच हा बहुमान मिळाला असून सर्वांचे ग्रामपंचायत च्या वतीने खूप खूप आभार!!

तसेच या दरम्यान स्पर्धेला कसे सामोरे जावे या साठी पंचायत समिती चे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी व सर्व कर्मचारी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले तसेच *मस्साजोग चे आदर्श सरपंच मा. श्री. धनंजय देशमुख* यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.त्याच बरोबर आपल्या गावचे पाणी पुरवठा विभाग मुंबई येथे कार्यरत असलेले *आशिष थोरात* यांनी दिलेल्या सूचना आणि केलेले मार्गदर्शन हे या यशस्वी टप्प्यावर कामी आले.

सर्वांचे पुनश्च धन्यवाद व समस्त कुंबेफळ करांचे मनपूर्वक अभिनंदन

सरपंच/सदस्य/ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय, कुंबेफळ

लोकनेते कै. बाबुरावजी आडसकर जीवन गौरव पुरस्काराचा वितरण सोहळा

आरोग्य आणि शेती क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल डॉ. एकनाथ शेळके व धर्मराज थोरात यांना सन्मानित केले जाईल

तभा वृत्तसेवा
किल्लेधारूर दि.२१ सप्टेंबर

केज येथील वसंत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सह.पत संस्था यांच्या वतीने दरवर्षी शेती, शिक्षण व आरोग्य या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना लोकनेते कै. बाबुरावजी आडसकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाते. यावर्षी आरोग्य क्षेत्रात स्वामी रामानंद तीर्थ शासकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथील डॉ. एकनाथ शेळके यांची निवड करण्यात आली आहे, तसेच शेती क्षेत्रातील आदर्श शेतकरी धर्मराज थोरात यांनाही पुरस्कारासाठी निवडण्यात आले आहे.

हा पुरस्कार वितरण सोहळा २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता गरड मंगल कार्यालय, किल्ले धारूर येथे आयोजित करण्यात आला आहे. पुरस्काराचे वितरण रमेशराव आडसकर यांच्या हस्ते होणार असून, या सोहळ्यात डॉ. स्वरुपसिंह हजारी, शेषेराव फावडे, अर्जुन गायकवाड, सुमंतराव डुबे, बाबुराव शिनगारे गुरुजी, महादेव तोंडे, सुनिल शिनगारे, बालासाहेब चव्हाण, डॉ. मयुर सावंत, संतोष सिरसट, सादेक इनामदार, मदनराव धोत्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या सोहळ्याबद्दलची माहिती चेअरमन सुरेश शिनगारे, व्हाईस चेअरमन प्रा. सुरेश कांबळे, संचालक प्राचार्य डॉ. माधवराव फावडे, सचिव बालासाहेब घुगे, खजिनदार दत्तु यादव, शाहूराव साखरे व इतर पदाधिकारी यांनी दिली आहे.मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे.

आज लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि, सुंदरनगरची अधिमंडळाची वार्षीक सर्वसाधारण सभाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
माजलगाव दि.२१ सप्टेंबर

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याची सन. २०२३-२०२४ या आर्थीक वर्षाची ३५ वी अधिमंडळ वार्षीक सर्वसाधारण सभा आज रविवार दि.२२/९/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता माजी मंत्री तथा उपाध्यक्ष, साखर संघ मुंबई मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेब आणि मा.धैर्यशीलकाका सोळंके यांच्या प्रमुख उपस्थीतीत कारखाना साईट, सुंदरनगर येथे आयोजीत करण्यात आलेली आहे.

तरी या अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेस कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी उपस्थीत रहावे असे आवाहन कारखाना प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना हा मराठवाडयातील प्रमुख साखर कारखान्यापैकी एक असुन कारखाना स्थापनेपासून ते आजतागायत एकही गाळप हंगाम खंड न करता सलग गाळप हंगाम घेणारा कारखाना म्हणून ओळख असुन शेतकऱ्यांच्या ऊसालाही सातत्याने विक्रमी भाव देणारा कारखाना म्हणुन ओळखला जातो. गतकऱ्यांचा आर्थीक कणा असलेल्याया कारखान्याची सन. २०२३-२४ या वर्षाची वार्षीक सर्वसाधारण सभा आज दिनांक २२/०९/२०२४ रविवार रोजी दुपारी १.०० वाजता कारखाना कार्यस्थळावर कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री आ.श्री. प्रकाशदादा सोळंके साहेच आणि मा.श्री. धैर्यशीलकाका सोळंके साहेब यांच्या प्रमुख उपस्थीतीत आयोजीत करण्यात आलेली आहे. ही सभा कारखान्याचे चेअरमन श्री. विरेंद्र प्रकाशराव सोळंके साहेब यांच्या अध्यक्षतेखाली आणि व्हाईस चेअरमन श्री. जयसिंग धेर्यशीलराव सोळंके साहेब यांचे उपस्थितीत संपन्न होत असुन यावेळी सर्व संचालक उपस्थीत राहणार आहेत. या सभेत माजीमंत्री आ. प्रकाशदादा सोळंके साहेब यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी कारखान्याचे सर्व सभासद, ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी वार्षीक सर्वसाधारण सभेस उपस्थीत रहावे असे आवाहन कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री. आर.सी. बडगुजर यांनी केले आहे.

अग्रलेख...

प्रगतीचे चक्र असेच फिरत राहिले पाहिजे...

महाराष्ट्र हे देशातील प्रगतिशील आणि पुरोगामी राज्य समजले जाते. विकासाच्या बाबतीतही देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र कितीतरी पुढे आहे. काही वर्षांपूर्वी देशातील बिमारू राज्यांची यादी जाहीर झाली होती. यात बिहार आणि उत्तरप्रदेशसह अन्य काही राज्यांचा समावेश होता. त्यावेळी या यादीत आपला समावेश नसल्याबद्दल महाराष्ट्र छाती काढून अभिमानाने पुढे उभा होता. महाराष्ट्र पुरोगामी आणि प्रगतिशील असण्यामागे महाराष्ट्राला लाभलेले दूरदृष्टीचे आणि विकासाभिमुख नेतृत्व कारणीभूत होते. त्याचप्रमाणे राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था स्थिती, हे एक प्रमुख कारण होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी आपल्या महाराष्ट्रातील विदर्भाच्या दौऱ्यात अनेक विकास प्रकल्पांचा तसेच कल्याणकारी योजनांचा शुभारंभ केला. मोदी पंतप्रधान झाल्यानंतर देशाचे चित्र वेगाने बदलले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा भारत आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा भारत यात जसा फरक आहे, तसाच फरक २०१४ च्या आधीचा भारत आणि २०१४ नंतरचा भारत यातही आहे. २०१४ नंतर भारताने सर्वच क्षेत्रात जी झेप घेतली, सर्वांगीण प्रगती केली, त्याला तोड नाही. आज विविध क्षेत्रांत आपण केलेली प्रगती पाहता आपण भारतात आहोत की सिंगापूरला, असा प्रश्न पडू शकतो. विशेष म्हणजे मोदी यांनी भारताचा समन्यायी विकास केला, भाजपाशासित राज्यांत विकासाची कामे झाली आणि काँग्रेसशासित तसेच विरोधी पक्षांची सत्ता असलेल्या राज्यांत विकासाची कामे झाली नाही, असे झाले नाही. कारण मोदींना देशाचा विकास करायचा होता आणि देशातील विविध राज्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकणार नाही, यावर त्यांचा विश्वास होता. मोदींच्या नेतृत्वात देशाचा जो विकास झाला, त्यात केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे मोठे योगदान आहे, सिंहाचा वाटा आहे. गडकरींनी देशभरात रस्त्यांची, महामार्गांची, एक्सप्रेसवेची तसेच पुलांची आणि टनेलची जी कामे केली, त्यामुळे विकासाला गती मिळाली. पायाभूत सुविधांचा विकास होत नाही तोपर्यंत त्या भागाचा आणि पर्यायाने देशाचा विकास होऊ शकत नाही, हे गडकरी यांनी दाखवून दिले. मोदींच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात गडकरी यांनी विकासाच्या रथाला आपल्या कार्यपद्धतीने जी गती दिली, त्यामुळे सारा देशच चकित झाला. सुरुवातीच्या काळात महाराष्ट्राचा विकास झाला असला, तरी तो विकास मुंबई-पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रापुरताच मर्यादित होता. विदर्भ आणि मराठवाडा हे भाग विकासापासून वंचित राहिले वा मुंबई-पुण्याच्या तुलनेत त्यांचा पाहिजे तेवढा विकास झाला नाही. विकास हा समन्यायी असला पाहिजे; मात्र राज्यातील काँग्रेसच्या नेतृत्वाने तो समन्यायी न करता विषमन्यायी असा केला. त्यामुळे विकासापासून वंचित राहिलेल्या भागात असंतोष उफाळून आला. त्याची परिणती वेगळ्या विदर्भाच्या मागणीत झाली.

महाराष्ट्रात पहिल्यांदा युतीचे राज्य आल्यानंतर शिवसेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले, तेव्हा आणि नंतर २०१४ मध्ये भाजपाचे देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले, तेव्हा महाराष्ट्राचा खऱ्या अर्थाने विकास झाला, असे म्हणायला हरकत नाही. आम्ही विदर्भाचा एवढा विकास करू की तुमच्यावर वेगळ्या विदर्भाची मागणी करण्याची वेळच येणार नाही, अशी ग्वाही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी काही वर्षांपूर्वी दिली होती; त्यांच्या शब्दांची पूर्तता मनोहर जोशी आणि देवेंद्र फडणवीस यांनी केली. विशेष म्हणजे या दोघांच्या कार्यकाळात विदर्भासोबत मराठवाड्याचाही विकास झाला. ज्या मुद्यासाठी वेगळ्या विदर्भाची मागणी केली जात होती, तो मुद्दाच पूर्ण झाल्यामुळे आज वेगळ्या विदर्भाची मागणी थंडावली आहे. महाराष्ट्रात येत्या महिना-दोन महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. पितृपक्ष संपल्यानंतर म्हणजे नवरात्रात महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांच्या विदर्भ दौऱ्याकडे निवडणुकीच्या चष्म्यातून पाहिले जाऊ शकते. पण मोदी यांच्या दौऱ्याचा आणि राज्यातील विधानसभा निवडणुकीचा तसा प्रत्यक्ष संबंध नाही. देशातील अनेक राज्यांत, सध्या जेथे विधानसभा निवडणूक नाही, अशा अनेक राज्यांतही मोदी यांनी विकासकामांचे भूमिपूजन केले वा जी विकास कामे पूर्ण झाली, त्यांचे लोकार्पण केले. कारण 'सबका साथ सबका विकास' यावर मोदी यांचा विश्वास आहे. त्यामुळे त्यांनी यात 'सबका विश्वास'चीही जोड दिली. देशातील गोरगरीब जनतेला विकासाचे फायदे मिळावे, म्हणून मोदी सरकारने अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या. देशातील ८० कोटी लोकसंख्येला गेल्या अनेक वर्षांपासून मोफत धान्य मिळत आहे. देशातील कोणावरच उपाशी झोपण्याची वेळ येऊ नये, हा यामागचा मोदी यांचा प्रामाणिक उद्देश आहे. पंतप्रधान विश्वकर्मा योजना मोदी सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. अकुशल कामगारांना त्यांच्या व्यवसायाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देत कुशल बनवणारी ही योजना आहे. गेल्या वर्षभरात देशभरात २० लाख विश्वकर्मांची नोंदणी झाली. त्यातील ८ लाख जणांनी कौशल्य प्रशिक्षणही पूर्ण केले. दीड लाखांवर विश्वकर्म्यांना १४०० कोटींच्या कर्जाचे वितरण आतापर्यंत झाले आहे. या विश्वकर्मा योजनेच्या लाभाचे डिजिटल वितरण मोदी यांच्या हस्ते झाले. १ लाख विश्वकर्म्यांना ओळखपत्र आणि कौशल्य प्रमाणपत्राचे ई वितरण मोदींच्या हस्ते झाले. मोदी नुसत्या योजना जाहीर करत नाहीत तर त्या योजनेची योग्यप्रकारे अंमलबजावणी होते की नाही, त्याचा फायदा संबंधितांना मिळतो की नाही, यावरही लक्ष ठेवून असतात. याशिवाय मोदी यांच्या हस्ते पीएम मित्रापार्क योजनेचे भूमिपूजनही अमरावतीत झाले. पाच 'एफ'ची ही योजना आहे. फायबर ते फॅक्टरी आणि फॅशन ते फॉरेन असा याचा विस्तार आहे. येत्या काळात महाराष्ट्रात अशा आणखी काही प्रकल्पांचा शुभारंभ झाला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

विकास कामांची ही प्रक्रिया सतत सुरू राहणारी आहे. देशात काही लाख कोटी रुपयांची विकास कामे झाली असताना कुठेही एक रुपयाचाही भ्रष्टाचार झाल्याची तक्रार आली नाही. कारण 'न खाऊंगा न खाने दुंगा,' हा मोदी यांचा निर्धार. संपुआ शासन काळात भ्रष्टाचाराच्या एक-दोन नाही तर शेकडो घटना घडल्या होत्या. पण मोदींच्या दहा वर्षांच्या काळात भ्रष्टाचाराची एकही घटना घडली नाही. देशातील प्रत्येक रुपया हा गोरगरीब माणसाच्या कल्याणावरच खर्च झाला पाहिजे, हा मोदींचा संकल्प आहे. काँग्रेस शासनाच्या काळात दिल्लीतून निघालेल्या रुपयातील १५ पैसेच जनतेपर्यंत पोहोचत होते. ८५ पैसे राजकीय नेते आणि नोकरशहा यांच्या अभद्र युतीच्या भ्रष्टाचारात स्वाहा होत होते. रेल्वेच्या क्षेत्रात तर मोदी सरकारने केलेल्या सुधारणा देशातील जनतेने पाहिल्या आणि अनुभवल्या आहेत. रेल्वेत क्रांतिकारी आणि आमूलाग्र असे परिवर्तन झाले आहे. देशात वंदेभारत गाड्यांचे नवे युग सुरू झाले आहे. वंदेभारत चेअर कार लोकप्रिय झाल्या आहेत. वंदेभारत मेट्रो गाड्याही सुरू झाल्या आहेत. वंदेभारत स्लीपर गाडी येत्या काही महिन्यात धावण्यासाठी सज्ज झाली आहे. वंदेभारत गाड्यांत बसल्यावर तसेच देशातील काही रेल्वेस्थानकांचा जो पुनर्विकास झाला, तो पाहून आपण भारतात आहोत, यावर विश्वासच बसत नाही. सगळे काही स्वप्नवत वाटण्यासारखी स्थिती मोदींनी निर्माण केली आहे. मुंबई-अहमदाबाद मार्गावर बुलेट ट्रेनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. याचे श्रेय तर पंतप्रधान मोदी यांना आहेच; पण रेल्वेमंत्री म्हणून अश्विनी वैष्णव यांचेही यातील योगदान तेवढेच महत्त्वाचे आहे. विकासाचा हा रथ आणि प्रक्रिया अशीच अव्याहत चालू राहण्यासाठी केंद्रात आणि राज्यातही भाजपा सत्तेवर असण्याची आवश्यकता आहे. भारताने जगातील तिसरी आर्थिक महाशक्ती तसेच विश्वगुरू होण्यासाठी हे आवश्यक आहे. देशातील जनतेने ईव्हीएममधून आपला आशीर्वाद वारंवार मोदी आणि भाजपाला दिला आहे, पुढेही देणार आहे, यात शंका नाही.

यंगिस्तान

जयेश शत्रुघ्न मेस्त्री

बुद्धीच्या देवतेलाच अटक?

दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव आनंदात आणि जल्लोषात साजरा झाला. सगळीकडे उत्साहाचं वातावरण होतं. काही महामूर्ख लोकांनी डीजेवर गलिच्छ गाणी वाजवून गणपती बाप्पाला त्रास देण्याचा प्रयत्न केला. पण आता हिंदूच अशा थिल्लरपणाबद्दल मोठ्या प्रमाणात बोलताना दिसत आहेत. अशा गोष्टींचा निषेध करत आहेत. हीच हिंदू धर्मीयांची खासियत आहे. सुधारणा घडवून आणण्याच्या बाबतीत हिंदूंची मानसिकता अतिशय पुढारलेली आहे. म्हणूनच आपण मागासलेल्या आणि जुनाट झालेल्या प्रथांचा नायनाट केला आणि हिंदू धर्माचं रक्षण केलं. या देशात असा समाजदेखील राहतो, ज्याला आधुनिकीकरण, संविधान, लोकशाही मूल्ये, मानवता यांच्याशी काही देणे-घेणे नाही. हजार-दीड हजार वर्षांपूर्वीच्या कालबाह्य गोष्टी जिवंत ठेवण्यासाठी विद्यमान परिस्थिती बिघडवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे. आकाशात जाऊन स्वर्गसुखाचा उपभोग घेण्यासाठी स्वर्गासारख्या पृथ्वीला नरक बनवण्याची मानसिकता जोपासली जात आहे. हिंदू समाजाकडून आनंदात साजरा होणाऱ्या गणेशोत्सवावर गालबोट लावण्याचा डाव आखला जात आहे. दरवर्षी आपण बातम्या वाचत असतो. अमूक अमूक मिरवणुकीवर दगडफेक. राम नवमीची मिरवणूक असेल, एखादी हिंदू यात्रा असेल किंवा गणपती विसर्जनाची मिरवणूक असेल दगडफेक होण्याच्या बातम्या दरवर्षी येतंच राहतात.

हे दगडफेक करणारे कोण असतात? कोणत्या समाजाचे असतात हे व्यवस्थित लपवलं जातं, त्यांची नावे दिली जात नाहीत. अशा वेळी दोन समाजात वाद झाला इत्यादी मथळे लावले जातात. मात्र, हिंदू किंवा भगवा आतंकवादी हा शब्द हीच मीडिया मोठ्या अभिमानाने मिरवते. त्यांची नावे आणि हा समाज कोण आहे हे लपवण्याचा जरी प्रयत्न झाला तरी आता सोशल मीडियाच्या कृपेमुळे अशा बातम्या जनतेपर्यंत पोहोचतात. पूर्वी मीडियावर डाव्या लोकांचं राज्य होतं. पण आता हिंदू मीडियादेखील मजबूत होत आहे. हिंदू जागृत होत आहेत. त्यामुळे अशा बातम्या आणि घटना लपून राहत नाहीत. कर्नाटकमध्ये असाच प्रकार झाला. एका विशिष्ट समाजाकडून गणपती विसर्जनाच्या मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ १३ सप्टेंबरला गणेश भक्तांनी आंदोलन केलं. मात्र, या आंदोलनाला परवानगी देण्यात आली नाही. पण लाडक्या बाप्पाच्या मिरवणुकीवर दगडफेक झाल्यामुळे गणेशभक्त भावुक झाले होते, त्यामुळे ते हळूहळू आंदोलनाच्या ठिकाणी जमू लागले. यावेळी आंदोलनकर्त्यांकडे गणेश मूर्तीही होती. गणपती हा आमचा लाडका देव आहे, आम्ही आमचे सण-उत्सव आनंदात आणि सुरक्षितपणे साजरे करतो. तरीदेखील आमच्या उत्सवांवर विशिष्ट समाजातले लोक दगडफेक करून दंगलसदृश वातावरण तयार करतात; आम्ही मात्र लोकशाही मार्गाने याचा प्रतिकार करतो. ही चांगली बुद्धी आम्हाला गणपती बाप्पाच देतो, ही यामागची आंदोलनकर्त्यांची भावना होती आणि म्हणूनच गणपतीची मूर्ती या ठिकाणी आणण्यात आली.

मात्र, हिंदू देवदेवतांवर टीका करणाऱ्या, रामाचं अस्तित्व नाकारणाऱ्या, राम मंदिराला आणि हिंदू सणांना विरोध करणाऱ्या काँग्रेस संस्कृतीला गणपती बाप्पाचाही एवढा राग असावा की त्यांच्या राज्यात पोलिसांनी गणपतीलाच अटक करावी? यावर आता सावरासावर करण्यात येत आहे. आम्ही गणेश मूर्तीच्या सुरक्षेसाठी ती मूर्ती व्हॅनमध्ये ठेवली, लोकांनी सोशल मीडियावर चुकीचा संदेश दिला आहे वगैरे वगैरे... पण काँग्रेसचा चेहरा लोकांसमोर आलाच. पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही भावना अनावर झाल्या आणि लाडक्या बाप्पाला अटक केल्यामुळे त्यांनी काँग्रेसवर शाब्दिक शरसंधान केले. काँग्रेस कितीही स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करत असली, तरी हिंदूंविषयी आणि हिंदू देवतांविषयी त्यांच्या मनातील राग लपून राहिलेला नाही. काही दिवसांपूर्वी संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनात खुद्द शरद पवार मंचावर बसलेले असताना ज्ञानेश महाराव या हिंदुद्वेष्ट्या माणसाने प्रभू श्रीराम आणि स्वामी समर्थ महाराज यांच्यावर अतिशय घाणेरड्या शब्दांत टीका केली आणि ही टीका शरद पवार चवीने ऐकत होते. पवारांनी याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही किंवा हिंदूंची माफीही मागितली नाही किंवा त्या कार्यक्रमाचा किंवा महाराव यांचा निषेधही केला नाही. याचा अर्थ पवारांना ज्ञानेश महाराव यांनी केलेली टीका मान्य आहे. हा आहे काँग्रेस संस्कृतीचा खरा चेहरा!

काँग्रेस संस्कृतीला हिंदू या शब्दाची एलर्जी आहे. तसं नसतं तर 'भगवा आतंकवाद' हा शब्द अस्तित्वात आलाच नसता, रामाच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेच नसते, हिंदूंच्या श्रद्धास्थानांवर चिखलफेक करणाऱ्या महारावसारख्या खलव्यक्तीला समर्थन दिलेच नसते आणि गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीवर दगडफेक करणाऱ्या समाजकंटकांचा नायनाट करायचं सोडून गणेशभक्तांनाच त्रास देत गणपती बाप्पाला अटक केलीच नसती. गणपती ही बुद्धीची, ज्ञानाची देवता आहे. तो गणांचा नायक आहे, आद्यपूजेचा मान त्याला मिळालेला आहे. त्यामुळे हिंदू धर्मात गणपती बाप्पाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. 'माझा बाप्पा किती गोड दिसतो', 'माझ्या पप्पांनी गणपती आणला' ही लहान मुलांची गाणी सुप्रसिद्ध झाली. गणपती बाप्पाचं रूप इतकं आकर्षक आहे की, लहान मुलांनाही बाप्पा खूप आवडतो. मग सर्व जातींना एकत्र आणणाऱ्या व लोकांचं कल्याण हाच आशीर्वाद देणाऱ्या बाप्पाच्या मिरवणुकीवर दगडफेक का केली जाते? या लोकांची मूळ समस्या आहे तरी काय? हिंदूंनी आपले उत्सव हिंदुस्थानात साजरेच करू नये का? आणि काँग्रेसमध्ये बहुसंख्य लोक हिंदू धार्मिक असूनही ते या समाजकंटकांच्या बाजूने का उभे राहतात? आता तर या निर्बुद्ध लोकांनी बुद्धीच्या देवतेलाच अटक केली. म्हणजे बुद्धीचा, ज्ञानाचा, प्रेमाचा, शांततेचा व सत्याचा मार्गच यांनी बंद केला आहे. 'यांना बुद्धी दे गणराया' असंही म्हणता येत नाही. पण बाप्पा, तुला अटक करण्यापर्यंत यांची मजल गेली. आता तुझ्याकडे एकच मागणे, 'यांच्या गर्वाचे घर खाली आण!'

writerjayeshmestry@gmail.com

वेध

विजय कुळकर्णी

दगडफेकींवर नियंत्रण कसे मिळविणार?

१७ सप्टेंबरला महाराष्ट्रात श्री गणेश विसर्जन करण्यात आले. यानिमित्त राज्यभरात विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या. या मिरवणुकांवर भिवंडी, बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव, जळगाव जामोद व आकोट येथे काही समाजकंटक व उपद्रवखोरांकडून दगडफेक करण्यात आली. तर, संग्रामपूर तालुक्यात सोनाळा येथे घरगुती गणपती वाण नदीत विसर्जित करण्यासाठी नेत असलेल्या सरपंचपुत्राचा काही लोकांनी रस्ता अडवून या रस्त्यावरून गणपती कसे नेत आहात, असे विचारले. त्यामुळे गावात काही काळ तणाव निर्माण झाला होता. या घटनांमध्ये दगडफेक करणारे कोण आहेत ते विविध वृत्तपत्रांत प्रकाशित झालेल्या झालेल्या बातम्यांमध्ये आले आहे. त्यामुळे त्याचा पुनर्उल्लेख येथे टाळत आहे.

वास्तविक शेगाव हे अतिशय शांताप्रिय तीर्थक्षेत्र आहे. कालपर्यंत गणेशोत्सवादरम्यान या शहरात कोणतीही अप्रिय घटना घडली नव्हती. पण, कालच्या घटनेने या शहराच्या इतिहासाला गालबोट लागले आहे. मात्र, अगदी नजीकच असलेले खामगाव हे शहर पोलिस दप्तरी संवेदनशील म्हणून नमूद आहे. तेथे काही वर्षांपूर्वी अशाच घडलेल्या घटनेनंतर लागलेल्या संचारबंदीचे चटके समाजकंटकांना बसले आहेत. त्यामुळे या शहराचा संवेदनशील असा उल्लेख होणे काही वर्षांपासून टाळला जात आहे. मात्र, ज्या शहरात कधीच हिंदू-मुस्लिम वाद झाला नव्हता अशा शेगावमध्ये गणेश विसर्जन मिरवणुकीला गालबोट लागले. एक मंडळ हमरस्त्याने विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी जात असताना या घटनेतील एक फिर्यादी शे. महेबूब शे. अहेमद यांनीच पोलिसांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांनी अ. हमीद चौकात थांबलेल्या मंडळाला तेथे गुलाल उधळण्यास मज्जाव केला. वास्तविक यातील घटनास्थळ हा हमरस्ता आहे. तेथे कोणतीही मशीद नाही. त्यामुळे कोणाच्या धार्मिक भावना दुखावण्याचाही संबंध नव्हता. ज्यांना गुलाल अंगावर पडण्याची ॲलर्जी आहे त्यांनी हिंदूंच्या गणपती, दुर्गा देवी मिरवणुकीच्या मार्गावर जाऊच नये. त्यामुळे त्यांनी गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांना गुलाल उधळण्यास हरकत घेणे कितपत योग्य आहे? गुलाल अंगावर पडला म्हणून दगडफेक करणे न्यायसंगत वाटत नाही. त्यावरून या घटनेचा सखोल तपास होणे आवश्यक आहे.

जळगाव जा. येथे वायली वेसमधून मिरवणूक पुढे गेल्यावर श्री रूपलाल महाराज मंडळावर दगडफेक करण्यात आली. यात मंडळाचे काही लोक जखमी झाले. या घटनेतील दगडफेकीचे कारण समजू शकले नाही. पोलिस त्याचा शोध घेतीलच. पण, या दोन घटनांवरून स्पष्ट होते की, आता दगडफेक करणाऱ्यांनी त्यांचा पवित्रा बदलला आहे. याआधी एखाद्या मशीद परिसरात दगडफेक होत होती. आता एक एकट्या मंडळांना गाठून त्यावर दगडफेक केली जात आहे. आकोट येथेदेखील एकाच मंडळावर दगडफेक करण्यात आली. या घटनांमध्ये दगडफेक करणाऱ्यांवर आजपर्यंत कारवाई झालेली नव्हती. यथावकाश ती होईल. पण, भविष्यात असे प्रकार घडू नये म्हणून पोलिस प्रशासनाने अधिक सजग राहणे गरजेचे आहे. गणपती, नवरात्र व हिंदू सणांना शासन-प्रशासनाकडून सार्वजनिक मंडळांवर विविध निर्बंध लावले जातात. मिरवणुकीत गुलाल उधळू नका, डीजे लावू नका, बँड पथकात मोजकेच वादक असले पाहिजेत, असे अनेक निर्बंध लावले जातात. पण, हमरस्त्याने जाणाऱ्या मंडळाला गुलाल उधळण्यास मज्जाव करणाऱ्यावर काय कारवाई होणार आहे, ते आता बघावे लागेल. तेव्हा, शासन व प्रशासनाने दोन्ही बाजूंच्या लोकांवर निर्बंध लावले पाहिजेत.

घटना घडल्यावर दगडफेक करणारे तर पळून जातात. मग, पोलिसांचा मार मंडळाच्या कार्यकर्त्यांनाच खावा लागतो. या घटनेतही तसा प्रकार घडला. जळगाव जा. येथे दगडफेक केल्याची तक्रार करण्यासाठी पोलिस ठाण्यात गेलेल्या मंडळांच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांवरच एसआरपीने लाठीचार्ज केला. याला काय म्हणावे? दंगल करणारे स्वत:हून पोलिस ठाण्यात येतील का? याचा विचार तरी पोलिसांनी करायला हवा होता. पण, तसे न करता गणेशभक्तांवरच पोलिसांच्या लाठ्या बरसल्या. तेव्हा, या घटनांचा विचार करताना भविष्यात असे प्रकार घडू नये, याची खबरदारी पोलिसांनी घेतली पाहिजे. कालचा हा प्रकार खूप मोठा नसला, तरी खूप गंभीर मात्र आहे. भविष्याचा वेध या घटनेतून मिळत आहे. त्यादृष्टीने पोलिस विभागाने गोपनीय विभाग अधिक सजग करून अधिक सतर्कता बाळगून या दगडफेकीच्या घटनांवर नियंत्रण मिळवावे, असे या निमित्ताने सांगावेसे वाटते.

८८०६००६१४९

मुंबई वार्तापत्र

नागेश दाचेवार

बावळट पोरं!

येत्या महिनाभरात विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने 'महायुती' आणि 'महाविकास आघाडी' तयारीला लागले आहेत. अशात आता एक नवी 'परिवर्तन महाशक्ती आघाडी' उदयास आली आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी, स्वराज्य संघटनेचे प्रमुख, माजी खासदार छत्रपती संभाजीराजे आणि प्रहार संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू यांनी मिळून ही तिसरी आघाडी बनविली असून यात वंचित बहुजन आघाडीदेखील सहभागी होण्याची शक्यता आहे. हे चारही घटक, चारही व्यक्ती राज्यात त्यांच्या त्यांच्या भागात प्रभावी असल्याने विधानसभेच्या अनेक जागांवर प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. या आघाडीला राज्यात जनतेचा प्रतिसाद मिळाला तर महाविकास आघाडीला याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. हा धोका लक्षात घेता उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी तिसरी आघाडी कायम सत्ताधाऱ्यांच्या मदतीसाठी आणि विरोधकांच्या मतांमध्ये दुफळी माजविण्यासाठी तयार केली जाते, असे वक्तव्य केले. संजय राऊतांच्या वक्तव्यानंतर तातडीने बच्चू कडूंनी 'संजय राऊतांनी बावळट पोरासारखं बोलू नये' अशा शब्दात पलटवार करून, राऊतांचा किमान शब्दात कमाल अपमान केला आहे.

संजयभाऊ तर बोलबच्चन आहेच. वायफळ बडबड करणे हा त्यांचा सवयीचा भाग आहे. कोणताही अभ्यास, माहिती नसताना सतत बरळत फिरणाऱ्या संजयभाऊंना बच्चूभाऊंनी अभ्यास न करता एखाद्या बावळट पोरासारखं बोलू नये, असा सल्ला यावेळी दिला, तो योग्यच म्हणावा लागेल. पण तरी राज्यातील सर्वात अशिक्षित, असंस्कृत, आचारशून्य, असभ्य, उद्धट, अशिष्टाचारी व्यक्तीकडून ही अपेक्षा करणे थोडी अतिशयोक्तीच म्हणता येईल.

तसे बच्चूभाऊंचा स्वभाव 'एक घाव दोन तुकडे'वाला एकदम रोखठोक आहे. संजयभाऊ यावेळी 'गलत हत्थे चढ गये है.' कारण जशाच तसे, त्याच भाषेत उत्तर देणाऱ्या बच्चूभाऊंशी खाजवण्याची चूक संजयभाऊंनी यावेळी केली आहे. बच्चू कडूच चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही भाषांत किंबहुना त्याहीपेक्षा कडक भाषेत प्रत्युत्तर देण्याची क्षमता ठेवतात. तसं राऊतांच्या खालच्या पातळीच्या भाषेची आणि अज्ञानी वृत्तीची बरोबरी कोणीही करू शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे. पूर्वी देवेंद्र फडणवीसांनी वारंवार सांगितलं आहे, राऊतांच्या वक्तव्याला फार महत्त्व देऊ नका. त्यांना कोणी विचारत नाही. आता ते तर विरोधक झाले ते म्हणतीलच. पण आत्ता नुकतंच महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीदेखील, संजय राऊतांचं ऐकत जाऊ नका, फार महत्त्व देऊ नका, असे पत्रकारांना सांगितले. जेव्हा विधानसभा एकत्र लढण्याच्या आणि जागावाटपाची चर्चा सुरू असताना, नाना पटोले संजय राऊतांबद्दल असे विधान करत आहेत. याचा अर्थ महाविकास आघाडीत त्यांची किती किंमत आहे किंवा त्यांच्या बोलण्याला किती किंमत आहे, याची प्रचीती येते. यावेळी वायफळ बरळणाऱ्या संजयभाऊंना बच्चूभाऊंनी ट्रेलर दाखवला आहे. निवडणूक कशी लढावी याची माहिती संजय राऊतांना नाही. जेव्हा भाजपा-काँग्रेस हे दोन पक्ष लढत होते तेव्हा शिवसेना निवडणुकीच्या रिंगणात उतरली होती. त्यावेळी ती तिसरीच होती ना. मग ते पैशासाठी लढत होते, सत्ताधाऱ्यांना मदत करायला लढत होते काय? असा सवाल करून गुगली टाकली. बच्चूभाऊंना जर पुन्हा प्रत्युत्तर देण्याच्या भानगडीत बावळट पोर पडलंच तर या बावळट पोराला 'इट का जवाब पत्थर से' मिळेल, यात शंका नाही.

युतीत सडले आणि आघाडीत?

एकीकडे विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू असताना उद्धव ठाकरे मात्र काहीसे अस्वस्थ आहेत. काँग्रेसने केलेल्या अंतर्गत सर्व्हेमुळे ठाकरेंचं टेन्शन वाढलं आहे; नव्हे तर काँग्रेसने वाढवलं आहे. त्यामुळे ठाकरेंची अवस्था केविलवाणी झालेली दिसत आहे. या सर्व्हेनुसार मविआमधील घटक पक्षांपैकी काँग्रेसला सर्वाधिक जागा, त्यानंतर शरद पवार गटाला आणि उबाठा गटाला केवळ २५ ते ३० जागा मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे अस्वस्थ झाले असून काँग्रेस आणि शरद पवार गट ठाकरेंवर हावी झालेले आहेत. लोकसभेच्यावेळी केलेली मुजोरी आता ठाकरेंच्या अंगलट आल्याचे दिसत आहे.

मुख्यमंत्रिपदासाठी चाललेली उद्धव ठाकरेंची धडपड या सर्व्हेमुळे पार धुळीस मिळाल्याचं दिसत आहे. थेट दिल्ली गाठून त्यांनी, मला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा, अशी मागणी केली. एवढंच नाही तर महाविकास आघाडीतील मित्रपक्षांनाही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी केली. परंतु, काँग्रेस आणि शरद पवार गटाने त्यांची ही मागणी परस्पर फेटाळून लावली आणि ज्याच्या जास्त जागा त्या पक्षाचा मुख्यमंत्री असं सांगून ठाकरेंना आल्या पावली माघारी पाठवलं.

अशातच काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार, असं विधान करून पुन्हा उद्धव ठाकरेंच्या जखमेवर मीठ चोळले. अशातच जागावाटपाची चर्चा सुरू असताना आम्हीच मोठा भाऊ अशी भूमिका काँग्रेसने महाविकास आघाडीत मांडली. त्यामुळे ठाकरेंची अशी काय आग झाली की पुन्हा संजयभाऊंनी मोठा भाऊ, छोटा भाऊची खुमखुमी कोणाला असेल तर परिणाम पुढे दिसतील, अशा पद्धतीने आगपाखड केली. या सगळ्यामुळे उद्धव ठाकरेंची अवस्था अत्यंत केविलवाणी झाली आणि 'ना इधर का ना उधर का' अशी गत झाली आहे. अशातच आता मी माजी मुख्यमंत्री झालोय्, असं सांगणं हे ठाकरेंची एकप्रकारे हताश मानसिकतेतील हतबलताच दिसते. त्यामुळे न दिलेल्या शब्दावरून अकांडतांडव करून २५ वर्षे युतीत सडलो, असे सांगत, भाजपासोबत मग्रुरीने युती तोडणाऱ्या ठाकरेंची अवस्था आघाडीत कशी दयनीय झाली आहे, हे न सांगताच सर्वश्रुत झाले आहे. न दिलेल्या शब्दासाठी मुख्यमंत्रिपदाच्या लालसेने जर भाजपासोबत मुजोरी न करता तेव्हाच माघार घेतली असती तर आज ही वेळ आली नसती, एवढं मात्र निश्चित...

९२७०३३३८८६

वाचक पत्रे

स्तुत्य निर्णय

प्रवासादरम्यान काही अडचण, तक्रार समस्या निर्माण झाल्यास प्रवाशांच्या तक्रारीचे शक्य तितक्या जलद गतीने निवारण होण्यासाठी ज्या आगाराची बस त्या आगार प्रमुखाचा संपर्क क्रमांक थेट गाडीवरच प्रसिद्ध करण्याचा एसटी महामंडळाने घेतलेला निर्णय अत्यंत स्तुत्य आणि प्रवासांना तक्रार कुठे मांडावी हा संभ्रम निर्माण न होता, अत्यंत सोयीचे होणार आहे; मात्र दिलेला नंबर कायमस्वरूपी कार्यरत असावा, तो कायमस्वरूपी बंद अथवा एंगेज नसावा आणि प्रवाशांच्या तक्रारी गतिमान व्हाव्यात एवढीच एक प्रवासी म्हणून माफक अपेक्षा.

विश्वनाथ पंडित/९५८८४५०४४२

●● ●●

डीजेचा जीवघेणा दणदणाट!

मंगळवारी गणरायाला वाजतगाजत निरोप देण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण होऊ नये

यासाठी प्रशासनाकडून गणेशोत्सव मंडळांवर काही निर्बंध घातले गेले होते तसेच लेझर बिम लाईटवर बंदी घालण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही गणेश मंडळांनी सर्व निर्बंध धाब्यावर बसवून गणेशोत्सवात तसेच विसर्जन मिरवणुकीत डीजेचा दणदणाट केला. त्यामुळे अनेक भाविकांच्या श्रवण क्षमतेच्या समस्येत ४० टक्के वाढ झाली. विसर्जन मिरवणुकीत तर डीजेचा दणदणाट सहन न झाल्याने मृत्यू झाल्याच्या बातम्यादेखील वाचण्यात आल्या. लेझर बिम लाईटवर बंदी असताना त्याचा सर्रास वापर करण्यात आल्याने अनेकांच्या डोळ्यांना इजा झाल्या. ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम माहीत असूनही गणपती मंडळांनी प्रशासनाचे निर्बंध धाब्यावर बसवून डीजेचा दणदणाट आणि लेझर बिम लाईटचा बेसुमार वापर केला. गणेश मंडळांकडून हे अपेक्षित नाही. गणेश मंडळांची ही कृती श्रीगणेशालादेखील आवडली नसेल. आपल्या अशा वागण्याने आ

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी तुळजापूर बंद

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२१ सप्टेंबर -

मराठा आरक्षणासाठी बसलेल्या म राठायोध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या म ागणीची सरकारकडून दखल घेतली जात नसल्याने आणि त्यांची प्रकृती चिंताजनक बनत चालल्याने राज्य सरकारच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने शनिवारी पुकारलेल्या तुळजापूर बंदला मोठा प्रतिसाद लाभला.

ग्रामीण भागात ही बंदचा जोर दिसुन आला. बहुतांशी व्यापारी वर्गाने स्वखुशीने आपले दुकाने बंद केले होते. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी सकाळी थोडा उशीरा बंद प्रारंभ केला.

कडकडीत बंद पाळला गेल्यानंतर मात्र भाविकांची गैरसोय होवु नये बंद दुपारी मागे घेण्यात आला. या बंद मधुन अत्यावश्यक सेवा वगळण्यात आल्या होत्या. शाळा, कॉलेज बंद होते, शासकिय कार्यालय येथे

तुरळक गर्दी होते.

रस्त्यावर वाहनांची वर्दळ, घटली होती. यावेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात होता बंद शांततेत पार पडला.

ढोकीच्या तेरणा साखर कारखान्याची पहिल्याच हंगामात ३ लाख मेट्रिक टनाचे गाळप...

तेरणाच्या सभासद संवाद मेळाव्याची जय्यत तयारी

२४ सप्टेंबर रोजी होणार पालकमंत्री सावंत यांच्या उपस्थितीत होणार सभासद संवाद मेळाव्याचे आयोजन...

तभा वृत्तसेवा
ढोकी, दि.२१ सप्टेंबर -

धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे महाराष्ट्रातील दुसरा व मराठवाड्यातील पहिला सहकारीतत्वावरील तेरणा सहकारी कारखाना तब्बल बारा वर्षानंतर चालू झाल्याने ऊस उत्पादकांची ऊस घालण्यासाठी होणारी गैरसोय दूर होऊन पहिल्याच गळीत हंगामात तीन लाख १२ हजार मेट्रिक टनाचे गाळप होऊन या परिसरात तील कारखान्यापेक्षा विक्रमी २८२५ रुपये प्रति टन भाव मिळाल्याने खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय मि ळाला. यामुळे सभासदात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३०० कोटी कर्जापोटी तेरणा कारखाना जिल्हा बँकेच्या ताब्यात गेला एक नव्हे तर सलग बारा वर्षे तेरणाने खऱ्या अर्थाने वनवास भोगला या काळात जिल्हा बँकेच्या अक्षम्य दुर्लक्षाम ुळे करोडरुपयां च्या चोऱ्यामाऱ्या झाल्या. या काळात काही सुजाण नागरिकांच्या दक्षतेमुळे यास आळा बसला. त्यानंतर तेरणा बचाव समि ती मार्फत परिसरातील नागरिकांनी आंदोलन छेडून प्रशासन व जिल्हा बँकेस तेरणाचा लिलाव काढण्यास भाग पाडले. अशा परिस्थितीत कोणीही तेरणा घेण्यास पुढे येत नव्हता. मात्र विद्यमान पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांच्या भैरवनाथ ग्रुपने धाडस दाखवून अल्पावधीत त्यांच्या नेतृत्वाखाली तेरणाचे कार्यकारी संचालक विक्रम सावंत यांनी आपले कौशल्यपणास लावून अक्षरशा स्मशान झालेल्या या परिसरात नंदनवन फुलवले आहे. या सीजनला कुणालाही वाटत नव्हते की तेरणा चालू होईल. परंतु अशा परिस्थितीतकाही जुन्या मशिनरींची दुरुस्ती व काही नवीन बसवून अल्पावधीत तेरणा चालू करून तीन लाख १२ टन असे विक्रमी गळीत केले, व या परिसरातील सर्व साखर कारखान्यापेक्षा जास्त म्हणजे प्रति टन २८२५ रुपये असा विक्रमी भाव देऊन स्वतः च्या नावाप्रमाणे ऊस भावातही विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी या भागातील ऊस उत्पादकांची उसासाठी होणारी ससेहोलपट त्यांनी दूर केली. तेरणाचे या भागात जवळपास लातूर, धाराशिव जिल्हा मिळून ३५ हजार ऊस उत्पादक सभासद आहेत.

या सभासदांना इकडे आड तिकडे विहीर अशी उसाबाबत अवस्था झालेली होती. मात्र हक्काचा तेरणा चालू झाल्याने ऊस

लागवड करण्यात सभासदात उमेद तयार झाली उशिरा का होईना या परिसरात पाऊस झाल्याने व तेरणाधरण भरल्याने ऊस लागवड मोठ्या प्रमाणात होत आहे.

त्याचा निश्चितच फायदा तेरणा परिसरातील ऊस उत्पादकांना तेरणा चालू झाल्याने होणार आहे. तेरणा सभासद व तेरणा प्रशासनाची तुटलेली नाळ नामदार सावंत यांच्या माध्यमातून मंगळवार दि.२४ रोजी खऱ्या अर्थाने जुळणार आहे. या सभासद संवाद मेळाव्यात आरोग्य मंत्री डॉ. तानाजीराव सावंत काय मार्गदर्शन करणार? याबाबत सभासदात उत्सुकता आहे. तेरणा चालू झाल्यानंतर सभासदांना दिवाळी व गुढीपाडवा या सणास प्रति सभासदास २५ किलो मोफत साखर दिली जात होती तीही या निमित्ताने दिली जाणार का,? अशी अपेक्षा ऊस उत्पादकातून केली जात आहे.

तेरणा कारखाना चालू झाल्याने ढोकीला विकासाची गती आली असून परिसरातील उद्योग व्यवसाय यांना जालना मिळाली. ढोकीसह ४० ते ४५ गाव या माध्यमातून नोकरीची संधी उपलब्ध करून बेरोजगार हाताला काम मिळाले.

संक्षिप्त वृत्त...

धाराशिव जिल्हा बंदला शिराढोण गावकऱ्यांचा प्रतिसाद

शिराढोण, दि.२१ सप्टेंबर -

मराठा आरक्षण संदर्भात संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील गेल्या पाच दिवसापासून आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांची प्रकृती काल चिंताजनक बनल्यामूळे अनेकांच्या भावना क्षेत्रात उचंबळून आल्या आणी मराठा आरक्षण आंदोलनाचे स्वरूप मोठे झाले मराठा आरक्षणासंदर्भात प्रत्येकाच्या भावना तीव्र झाल्या असून सरकार याची दखल घेत नाही म्हणून धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. त्याला प्रतिसाद म्हणून कळंब तालुक्यातील शिराढोण गाव कडकडीत बंद पाळून सरकारचा निषेध व्यक्त केला. या बंदला गावातील सर्व नागरीकांनी व व्यापाऱ्यांनी योग्य सहकार्य केले.

तेरणा अभियांत्रीकीत आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने राज्यात विविध म हाविद्यालयातून प्रत्येकी एक आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून एक केंद्र तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय या ठिकाणी असलेल्या सर्व सुविधांचा विचार करून तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त आणि विद्यमान आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या मार्गदर्शना खाली स्थापन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, विभाग प्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत भोसले हायस्कूलचे चारही संघ विजयी

धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -

जिल्हा क्रीडा अधिकारी धाराशिव आयोजित जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा दि.१३ ते १९ सप्टेंबर दरम्यान प्लाईंग कीडस इंटरनॅशनल इंग्लीश स्कूलच्या मैदानावर संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये प्रशालेतील १४, १७, २२ वयोगटातील मुले व १९ वयोगटातील मुलींचा संघ प्रतिपक्षाच्या संघाला पराभूत करून धाराशिव जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून विभागीय स्पर्धेला पात्र ठरले आहेत. हे संघ धाराशिव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. या विजयी संघास क्रीडा शिक्षक विक्रम सांडसे, इंद्रजित वाले, रितेश जाधव, धीरज लोमटे, प्रज्वल इजारे यांनी मार्गदर्शन केले. विजयी संघाचे प्रेमा पाटील, आदित्य पाटील, नंदकुमार नन्नवरे, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, राजेंद्र जाधव यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ज्ञानोद्योग विद्यालयातील दोन मुली कुस्ती स्पर्धेत प्रथम

येरमाळा, दि.२१ सप्टेंबर -

येरमाळा येथील ज्ञानोद्योग विद्यालयातील सृष्टी जमदाडे आणि देवयानी जमदाडे यांनी जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला आहे. दि.२० सप्टेंबर रोजी तुळजाभवानी स्टेडियम धाराशिव येथे शालेय जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडल्या. यामध्ये येरमाळा येथील सृष्टी संतोष जमदाडे ही १९ वर्षाखालील वयोगटातील ६२ किलो वजन गटामध्ये प्रथम क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. तर १४ वर्षाखालील वयोगटामधील ५४ किलो वजनी गटामध्ये ज्ञानोद्योग विद्यालयाची विद्यार्थिनी देवयानी संतोष जमदाडे हिने देखील जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. जमदाडे भगिनींच्या या यशाचे येरमाळा ग्रामस्थांकडून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

अविनाश शिंदे यांचे निधन

धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -

अविनाश निवृत्तीराव शिंदे (वय ५१) यांचे दि.२० सप्टेंबर रोजी निधन झाले ते यांत्रिकी विभाग धाराशिव कार्यालयात वरिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगा, २ मुली व नातवंडे असा परिवार आहे.

परंडा शहरासह तालुका कडकडीत बंद

जरांगे-पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा... तहसिलदार यांना निवेदन...

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२१ सप्टेंबर -

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देत शनिवार (दि.२१) परंडा शहर व तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दुपारी १२ वाजता परंडा तहसिलदार निलेश काकडे यांना परंडा तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले.

यावेळी पोलीस निरिक्षक विनोद इज्जपवार उपस्थित होते. यावेळी जय जिजाऊ-जय शिवराय, एक मराठा लाख मराठा-कोट मराठा, जरांगे पाटील आगे बढो हम तुम्हारे साथ है आदि घोषणा समाज बांधवांनी दिल्या.

निवेदनात म्हटले आहे कि, मराठा संघर्ष योद्धा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासह विविध मागण्यांसाठी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी मंगळवार दि.१७ सप्टेंबर रोजी पासून अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा ५ वा दिवस असून त्यांची प्रकृती खालावत असून चिंताजनक आहे. सरकारला जागे करण्यासाठी परंडा तालुका सकल मराठा सम ाजातर्फे जरांगे पाटील यांना पाठिंबा देत आहोत. या अनुषंगाने शनिवार दि.२१ रोजी परंडा शहर व तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला आहे.

यावेळी मोठ्यासंख्येने समाज बांधव उपस्थित होते.

नळदुर्गमध्ये अनुष्ठान सभामंडप उभारणी कामाचे भूमिपुजन

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२१ सप्टेंबर -

नवरात्र महोत्सवात दि.३ ऑक्टोबर ते १२ ऑक्टोबर या कालावधीत नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिरात महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज लोक कल्यानासाठी आपल्या छातीवर घटस्थापना करून अनुष्ठान करणार आहेत. दि.२१ सप्टेंबर रोजी अनुष्ठान सभामंडप उभारणीच्या कामाचे भुमीपुजन करण्यात आले.

ऐतिहासिक नळदुर्ग शहराच्या इतिहासात पहिल्यांदाच नवरात्र म होत्सवात अशप्रकारचा अनुष्ठानाचा भव्य, दिव्य कार्यक्रम पार पडत आहे. महान तपस्वी श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज हे नवरात्रीच्या पहिल्या दिवसांपासुन ते विजया दशमीपर्यंत नळदुर्ग येथील अंबाबाई मंदिरात देवीसम ोर आपल्या छातीवर घटस्थापना करून अनुष्ठान करणार आहेत. त्याचबरोबर अनुष्ठान समाप्तीनिमि त्त श्री बालयोगी परमहंस महेश्वरानंद महाराज यांच्या हस्ते ५१ हजार सिद्ध रुद्राक्षाचे वाटप करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमाचे नियोजन नळदुर्ग सकल हिंदु सम ाज करीत आहे.

यावेळी संजय बताले, श्रमिक पोतदार, धीमाजी घुगे, सरदारसिंग ठाकुर, संतोष पुदाले, रमेश जाधव, संजय विठ्ठल जाधव, गणेश मोरडे, अक्षय भोई, विजय ठाकुर, अजय दासकर, ज्योती बचाटे, चंदन पुदाले आदिजन उपस्थित होते.

महिलांचा सन्मान कर्तृत्वाचा; जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते सत्कार

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२१ सप्टेंबर -

गवळी गल्लीतील श्री बाल हनुम ान गणेश मंडळ, मानाचा गणपती व धाराशिवचा महाराजा म्हणून गणल्या गेलेल्या मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षापासून गणेशोत्सवाच्या या कालावधीमध्ये एक पूर्ण दिवस महिला कर्तृत्व सन्मान दिन उत्साह पूर्ण साजरा करण्यात आला.

महिलानी त्यांच्याच व विविध क्षेत्रातील कौतुकास्पद व गौरवशाली या कार्याचा सन्मान व सत्कार केला जातो.

जिल्हाधिकारी ओंबासे यांच्या हस्ते, अश्विनी नागटिळक महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत पास होऊन पोलीस निरीक्षक या पदावर निवड झाल्याबद्दल अनिकेत साबळे, पोलीस निरीक्षकाच्या पदावर निवडीबद्दल बालाजी कदम, जलसंपदा कार्यालयात इंजिनीयर म्हणून किरण धनवडे, अभियंता म्हणून रंजीत रणजीत रणदिवे यांचा सत्कार करण्यात आला. अमेरिकेतील व्हेरी नाईस विद्यापीठ शिकागो येथून मास्टर इन कॉम्प्युटर सायन्स पदवी घेत असलेले जानवी कथले, सम ाजसेविका म्हणून कार्यरत असलेल्या पुष्पा शिंदे, उल्का मुर्गे, चौगुले या महिलांच्या सुप्त कला गुणाला विकसित करण्यासाठी व महिलांच्या सक्षमीकरण व सबलीकरणासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले गेले होते.

चित्रकला, नृत्यकला, वेशभूषा,

उखाणे, समूहनृत्य सूप नृत्य विविध विजेते सर्वांचा सन्मान पारितोषिक देऊन करण्यात आला. सन्मान शेला सन्मानचिन्ह व श्री ची प्रतिमा असलेले देऊन प्रतिमा देऊन करण्यात आला.

जरांगे यांच्या उपोषणास पाठिंब्यासाठी ढोकी बंद

तभा वृत्तसेवा
ढोकी, दि.२१ सप्टेंबर -

तालुक्यातील ढोकी मराठा आरक्षणासाठी आंतरवली सराटीत उपोषणासाठी बसलेले म नोजरागे पाटील यांच्या मागण्या त्वरित मान्य करा व्यात यासाठी पुकारलेल्या ढोकी बंदला नागरिकांनी बंद ठेवून पाठिंबा दिला.

बंदच्या पार्श्वभूमीवर शिवाजी चौक, ढोकी बस स्टॅन्ड, ढोकी गाव या परिसरातील दुकाने व्यावसायिकांनी स्वयंपुरतेने बंद ठेवून पाठिंबा दिला बंद मुळे ढोकी बस, स्टँड, गाव शिवाजी चौक या गर्दीच्या ठिकाणी सर्वत्र शुकशुकाट पसरलेला होता.

तडवळे येथे सरकारचा निषेध व्यक्त, कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा
कसबे तडवळे, दि.२१ सप्टेंबर -

धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथे सकल मराठा समाजाच्या वतीने कडकडीत बंद पाळण्यात आला व गावातून शांततेत रॅली काढण्यात आली. सतत मराठा समाजाला सरकार मुद्दाम वेठीस धरत आहे. आरक्षणाचा मुद्दा टाळत आहे. आज मराठा समाजाच्या जवळपास २०० युवकाने आत्तापर्यंत आत्महत्या केलेल्या आहेत. तरी या सरकारला घाम फुटत नाही. आज शेतात काम करणारा समाज फक्त मराठा समाज आहे. चांगल्या पद्धतीने मार्क मिळवून

सुधा मराठा समाजाला कुठे नौकरी मिळत नाही. मराठा समाजाने किती दिवस आत्ता सहन करायचं.

१६ तारखे पासून संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील उपोषण करत आहेत.

या आंदोलनाला गावातील मुस्लिम समाजातील शिवप्रेमी मुक्तार कोतवाल या युवकाने स्वतःच्या कुटुंबाचा व मुस्लिम बांधवांचा जाहीर पाठिंबा आहे असे सांगून हम सब लडेंगे, हम सब जितेंगे, हम सब जरांगे, एक मराठा लाख मराठा, कोण म्हणत देत नाही घेतल्या शिवाय राहत नाही अश्या घोषणा देऊन मराठा बांधवांनो तुम्ही आत्महत्या करू नका, या सरकारच्या छातीवर बसून आरक्षण घेऊ असे पाठबळ दिले.

यावेळी उद्योजक राजाभाऊ लोंढे, विशाल जमाले, विकास उबाळे, सोमनाथ भोसले, किशोर कदम, लखन कदम, धनाजी गडकर, नाना जमाले आणि सकल मराठा समाज एकजुटीने उपस्थित होता.

वागदरीला मधूकरराव चव्हाण यांची भेट; काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढवणार

तभा वृत्तसेवा
जळकोट, दि.२१ सप्टेंबर -

तुळजापूर विधानसभा म तदारसंघातून पाच वेळा विजय हस्तगत करुन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून तर धाराशिव जिल्हा पालकमंत्री म्हणून प्रतिनिधित्व करणारे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी वागदरी गावाला भेट देऊन आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुक संदर्भात ग्रामस्थांशी संवाद साधून, पुन्हा एकदा आपण तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून म हाविकस आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले.

मधुकरराव चव्हाण हे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रातील जेष्ठ बुजुर्ग नेते आहेत.त्यानी आता पर्यंतच्या राजकीय कारकीर्दमध्ये तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून पाच टर्म विजय हस्तगत करुन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, विधानसभा उपाध्यक्ष आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री असा पदभार सांभाळत तुळजापूर विधानसभा मतदारसंघात अनेक साठवण तलावासह विविध विकासात्मक कामे केलेली आहेत. उजणी धरणाचे अतिरिक्त पाणी मराठवाड्याला विशेषतः धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आणि धाराशिवला मिळाले पाहिजे. यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा

करून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे.

वागदरी येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या आतापर्यंत केलेल्या विकास काम ांना उजाळा दिला. आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपण निवडणूक लढविणार असून मतदार बंधू भगिनींने सहकार्य करावे, असे त्यांनी आवाहन केले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अरविंद चव्हाण विधानसभेच्या रिंगणात

माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घेतली भेट

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अवघ्या काही दिवसावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर जालना विधानसभेसाठी माजी आमदार तथा अजित पवार राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांनी जोरदार तयारी केली असून त्यांनी बुधवार दि. १८ सप्टेंबर २०२४ सकाळी ११.३० वाजता राष्ट्रवादी अजित पवार गटाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची भेट घेतली. दरम्यान या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे यांनी दिली.

जालना विधानसभेची जागा ही राष्ट्रवादी अजित पवार गटाला सुटली पाहिजे यासाठी माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी जोरदार फिल्डींग लावलीय. त्यासाठी त्यांनी दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ७.३० वाजता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांची देखील भेट घेतली असून जालना विधानसभा मतदार संघ हा अजित पवार गटाकडे सोडवून घेण्यासाठी प्रयत्न केलेत.

माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी जालना विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी पुर्ण तयारी केली. त्यासाठी त्यांनी आपल्या पारड्यात टिकीट पाडून घेण्यासाठी मुंबईच्या चकारा वाढल्या आहेत. युवा नेते धैर्यशिल चव्हाण यांच्या नेतृत्वात आज एका शिष्टमंडळाने अजित पवार यांची भेट घेतली असून जालना विधानसभेची जागा राष्ट्रवादीकडे सोडवून घेण्याची मागणी केली. दरम्यान अजित पवार यांनी सकारात्मक चर्चा केली असून अरविंद चव्हाण यांना उमेदवारी निश्चित असल्याचं कार्यकर्त्याकडून सांगण्यात आलंय.

गाडगेबाबा घानेवाडी जलाशयाच्या समृद्धीसाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार –खा.डॉ.कल्याण काळे

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

राष्ट्रसंत गाडगेबाबा घाणेवाडी जलाशयाच्या समृद्धीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन खासदार डॉ.कल्याण काळे यांनी दिले. घाणेवाडी येथील संत गाडगेबाबा जलाशयाला सोमवार दि.१६ रोजी त्यांनी भेट दिली. तलावाची पहाणी करून या तलावाच्या विकासासह विविध समस्या समजून घेतल्या. यावेळी शिरपूर पॅटर्नचे जनक जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर, घाणेवाडी जलसंरक्षण मंचाचे अध्यक्ष भाईश्री रमेशभाई पटेल, जयप्रकाश चव्हाण, उद्योजक सुनील रायठठ्ठा, उदय शिंदे,ओमप्रकाश चितळकर उपस्थित होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून जालना शहरासह परिसरातील बावीस गावे आणि शेतीला पाणी पुरवणारा तलाव ही आपली ऐतिहासिक धरोहर आहे. आपल्या पूर्वजांच्या कर्तृत्वाची ही निषाणी आहे.याचे शास्त्रशुद्ध पध्दतीनुसार जतन आणि संवर्धन करण्याचे काम लोकसहभागातून घाणेवाडी जलसंवर्धन मंचाच्या नेतृत्वाखाली चालते. हा आदर्श संपूर्ण राज्यभरात घेण्याची गरज असल्याचे खा.डॉ.काळे यावेळी बोलतांना म्हणाले. घाणेवाडी तलावाचे दोन्ही सांडवे तात्काळ दुरूस्त करून तलावाच्या भिंतीवरील पिचींग दुरूस्त करण्याची गरज असल्याचे भाईश्री रमेशभाई पटेल यांनी सांगितले. लोकसहभागातून यंदाच्या वर्षांत पाच लाख ट्रॅक्टर गाळ काढून परिसरातील शेतकऱ्यांना देण्यात आल्याची माहीती उद्योजक सुनील रायठठ्ठा यांनी यावेळेस दिली घाणेवाडीतील गाळ काढून कुंडलिका नदीपात्रात मोठ्या विहिरीतून पाणी उपलब्ध झाल्यास जायकवाडी धरणातून अतिशय अल्प प्रमाणात पाणी घेण्याची जालना शहराला गरज असेल असे जलतज्ज्ञ सुरेश खानापूरकर यांनी सांगितले. जालना शहरातील विविध क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शहरातील विविध सामाजिक व सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह बैठक घेणार असल्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी सांगितले.

संक्षिप्त

जागर प्रतिष्ठानच्या राज्य कार्यकारणी सदस्यपदी विठ्ठल पाटील यांची निवड



तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद प्रतिनिधी

महाराष्ट्रभर दुर्गसंवर्धन आणि विविध सामाजिक उपक्रम राबवून नावारूपाला आलेल्या जागर प्रतिष्ठान या संघटनेच्या राज्य कार्यकारणी सदस्य पदी मुखेड येथील प्रगतशील शेतकरी विठ्ठल ताटे पाटील यांची निवड करण्यात आलेली आहे ,विठ्ठल पाटील यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन संघटनेचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण यांनी त्यांना निवडीचे प्रमाणपत्र दिले आहे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७४ वा वाढदिवस स्वच्छ्ता कर्मचाऱ्यांचा सत्कार व १० संकल्प घेवून अनोख्या पद्धतीने साजरा

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ७४ वा वाढदिवस स्वच्छ्ता कर्मचाऱ्यांचा सत्कार व १० संकल्प घेवून डॉ. स्वप्नील बी. मंत्री मुख्य प्रदेश प्रवक्ते तथा मुख्य प्रदेश समन्वयक भाजपा वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेश यांच्या संकल्पनेतून अनोख्या पद्धतीने भाजपा वैद्यकीय आघाडी महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने साजरा करण्यात आला. अहोरात्र स्वच्छतेसाठी कार्य करणाऱ्या स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार व १० संकल्प ७४ परिवाराकडून घेवून पंतप्रधान मोदींच्या दीर्घायू आयुष्यासाठी प्रार्थना करण्यात आला. १० संकल्पात पाणी वाचवणे, डिजीटल व्यवहाराला प्रोत्साहन देणे, वोकल फॉर लोकल अभियान अंतर्गत भारत बनलेल्या वस्तूंचा वापर करणे, गुणवत्तायुक्त वस्तूंचे उत्पादन करणे, प्रथम देश फिरल्यावर नंतर विदेशात फिरणे, शेतकऱ्यांना जैविक शेतीसाठी जागरूक करणे, सुपर फूड बाजराला दैनंदिन जीवनाचा भाग बनवणे, योगा, खेळ, फिटनेसला प्राथमिकता देणे, कमीत कमी एका गरीब कुटुंबाला समर्थन देणे आदी गोष्टींचा समावेश आहे.

यावेळी डॉ सुधीर आंबेकर, डॉ हरिप्रसाद ढेरे, अजित पोरवाल, सुमित मोर, सखाराम कुलकर्णी, संतोष पवार, अर्जून भांडवलकर, हरिओम निंबाळकर, श्याम लोमटे, श्रीराम बगडीया, अशोक काळे व नागरिक मोठया संख्येने उपस्थीत होते.

इनरव्हील होरायझनतर्फे पांजरापोळ ट्रॅकवर आरोग्यवर्धक फिटनेस बॅनरद्वारे जनजागृती

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनतर्फे पांजरापोळ गोशाळेच्या जॉगिंग ट्रॅकवर शुक्रवार दि. २० सप्टेंबर रोजी आरोग्यवर्धक जनजागृतीपर २८ संदेश फलक लावण्यात आले. पांजरापोळ जॉगिंग ट्रॅकवर दररोज सकाळी आणि सायंकाळी हजारो लोक नियमितपणे या ट्रॅकला भेट देतात. तसेच शेकडो लोक जॉगिंग, चालणे, व्यायाम, योगा आणि गोसेवा करण्यासाठी येथे येतात.त्यात शाळेची मुलेदेखील असतात. या उपक्रमाचा उद्देश लोकांना सुदृढ आरोग्यासाठी संदेश वाचण्यास प्रवृत्त करून त्यांना नियमित व्यायाम करण्यास आणि आपल्या आरोग्याला प्राधान्य देण्यास प्रेरित करणे हा उद्देश आहे. आपल्या शरीराचे मोल सर्वात मोठे असून त्याची काळजी घेणे आपली प्राथमिक जबाबदारी असल्याचे हे संदेश अधोरेखित करतात. त्यासाठी ट्रॅकवर ठीकठिकाणी २८ संदेश फलक लावून त्यातून सुदृढ आरोग्याचे महत्व पटवून देण्यात आले आहे. या उपक्रमाचा शुभारंभ पांजरापोळचे विश्वस्त महिंद्रप्रसाद भक्कड, विजयकुमार कामड, उद्योजक शंकर शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी क्लबच्या सचिव ड. पिंकी लड्डा, आरती भक्कड, वैष्णवी मिसाळ, पुनम अग्रवाल, उर्वशी खंडेलवाल आदींची उपस्थिती होती. यावेळी महेंद्रप्रसाद भक्कड म्हणाले की, प्रत्येकाने आपल्या सुदृढ आरोग्यासाठी जागरूक राहिले पाहिजे. त्यासाठी दररोज व्यायाम केला पाहिजे. दररोज ट्रॅकवर येऊन व्यायाम केला पाहिजे. ईन्नरव्हील होरायझनतर्फे संदेश फलक लावून आरोग्यविषयक जनजागृती चा उपक्रम अत्यंत स्तुत्य असल्याचे ते म्हणाले. क्लबच्या सचिव ड. पिंकी लड्डा म्हणाल्या की, आपण या वयातच आरोग्याला जपले तर भविष्यात आरोग्य आपल्याकडे लक्ष देईल आणि आपले जीवन आनंदीमयी आणि सुखदायी राहील. हाच उद्देश समोर ठेवून जॉगिंग ट्रॅक वर संदेश फलक लावण्याचा उपक्रम आम्ही राबविल्याचे त्यांनी सांगितले.

वरखेड सि. गावातून भाजपा हद्दपार

मा.पं.स.सदस्य, सरपंच, उपसरपंच व सदस्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जालना विधानसभा मतदारसंघातील मौजे वरखेड सिंदखेड तालुका जालना या गावांमध्ये भारतीय जनता पार्टीला जबरदस्त खिंडार पडले असून गावातील माजी पंचायत समिती सदस्य तथा विद्यमान सरपंच सर्जेराव आण्णा शेवाळे, उपसरपंच गणेशराव शेवाळे, ग्रामपंचायत सदस्य नंदू आप्पा काटकर, माजी उपसरपंच गणेशराव शेवाळे, ग्रा.पं. सदस्य सोनाजीराव घडलिंग,गोंदेगाव चे माजी चेअरमन रंजनराव खरात, गणेश शेवाळे माजी शालेय समिती अध्यक्ष, कचरू आप्पा काटकर ,धोंडीराम काटकर, कार्तिक आप्पा काटकर ,आदी कार्यकर्त्यांनी शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनरावजी खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भाग्यनगर येथील दर्शना बंगल्यावर शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्क नेते पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोषराव मोहिते, तालुकाप्रमुख भगवानराव अंभोरे, जालना बाजार समितीचे संचालक संजय वाघ, तुकाराम खर्जुले, विभाग प्रमुख सचिन देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना उपनेते अर्जुनराव खोतकर यांनी प्रवेश कर्त्यांचे शिवसेना पक्षात प्रवेश केल्याबद्दल शाल व पस्पहार घालून स्वागत करून सर्वांचे आभार व्यक्त केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी गावातील अशोक आप्पा काटकर, गीताराम तिडके, बाळासाहेब जाधव, शिवाजी जाधव, नितीन जोगदंड, जालिंदर जोगदंड, गणेश शेवाळे, सखाराम लंके वैजीनाथ परळकर नजीर भाई, आधीची प्रमुख उपस्थिती होती.

गरीब मुलांच्या चेहऱ्यावरील आनंदापेक्षा मोठा आनंद नाही –आ.कैलास गोरंटयाल

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनीधी

दसरा, दिवाळी सारखे सन आपल्यासह प्रत्येकांच्या जीवनातील आनंदाचा क्षण असतो. मात्र,नौकरी मिळाल्याने गरीब मुलांच्या चेहऱ्यावर दिसत असलेला आनंद यापेक्षा मोठा आनंद आपल्याला झाला असे भावोद्गार आ. कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलतांना काढले.

जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेत असलेल्या होतकरू विद्यार्थ्यांसाठी जालना जनसेवा ग्रुप आणि आयएसआय ई इंडिया या संस्थेच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय प्रशिक्षण शिबिरातून २१ पैकी १३ विद्यार्थ्यांना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नौकरी मिळाल्याने त्यांचे कौतुक व प्रशस्तीपत्रांचे वाटप काल शुक्रवारी आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी संस्थेच्या प्राचार्या श्रीमती रजनी एस. शेळके, जालना जनसेवा ग्रुपचे सचिव डॉ. रामनारायण जैस्वाल, सुदेश करवा आयएसआय ई इंडिया या संस्थेच्या झोनल मॅनेजर रुपाली अग्रवाल नरेश गुप्ता, सुनील राठी, संजय बाहेती, आयएसआय ई इंडिया या संस्थेचे प्रशिक्षक गणेश राजपूत यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. आपल्या भाषणात आ.गोरंटयाल यांनी जालना जनसेवा ग्रुपच्या माध्यमातून सुरू असलेल्या कार्याची प्रशंसा करून गणपती उत्सव असो की दसरा, दिवाळी सारखे सन असो या सणांचा आनंद प्रत्येकांच्या चेहऱ्यांवर दिसून येतो. जालना जनसेवा ग्रुपचा सदस्य म्हणून जालन्यातील जास्तीत जास्त बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आपण स्वतः प्रयत्न करणार असल्याचे स्पष्ट करून आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, त्यासाठी लागणाऱ्या मदतीची काळजी करू नका, माझ्यावर सोडा सर्वोतोपरी मदत मिळवून देण्याची तयारी त्यांनी यावेळी दर्शवली. इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढल्याने भविष्यात पेट्रोल, डिझेलचा वापर कमी होणार असून ही बाब लक्षात घेवून तरुणांना वाव मिळेल, त्यांना रोजगार मिळेल अशा पद्धतीचे ट्रेड या प्रशिक्षण संस्थेत सुरू करण्याचा आपला प्रयत्न राहील अशी ग्वाही आ.कैलास गोरंटयाल यांनी यावेळी दिली.

मंठा तालुक्यातील २६९ दिव्यांग लाभार्थ्यांना ४५५ नग विविध साहित्याचे आमदार लोणीकरांचे हस्ते वाटप

केंद्र व राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांचा सन्मान - आमदार बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

केंद्र व महायुतीच्या महाराष्ट्र शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून दिव्यांगांचा सन्मान केला आहे. दिव्यांगांच्या विकासासाठी अनेक योजना प्रभावीपणे राबवून दिव्यांगाना सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्याचे महत्वपूर्ण काम केले आहे असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी आज केले

तहसील कार्यालय मंठा येथे आयोजित दिव्यांग बांधवांना मोफत साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी श्री लोणीकर बोलत होते यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की राज्य व केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये दिव्यांगांच्या विकासासाठी भरीव तरतूद करण्यात आली असून दिव्यांग बांधवांनी विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आवाहन देखील यावेळी लोणीकरांनी केले. दिव्यांग बांधवांना

मोफत साहित्य वाटप कार्यक्रम प्रसंगी २ बॅटरी ऑपरेटेड ट्रायसायकल, ४७ ट्रायसायकल, ४६ व्हील चेअर आणि सिपी चेअर, २७२ चालण्याच्या काठ्या, २२ ब्रेल छडी, १३ सुगम्य छडी, २ स्मार्ट फोन, २४ बीटीई श्रवणयंत्र, २७ कृत्रिम हातपाय, असे एकूण ४५५ नग साहित्य २६९ लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले

दिव्यांग नागरिकांना सर्वसामान्य नागरिकांच्या तुलनेत मिळणाऱ्या सोयी सुविधांकडे दुर्लक्ष केले जातं असं असताना आता यात माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा शहरांमध्ये महत्वपूर्ण कार्यक्रम आयोजित करून त्या ठिकाणी दिव्यांग बांधवांना आवश्यक त्या साहित्यांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये सर्व प्रकारच्या दिव्यांग बांधवांसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वर्षभरापूर्वी ग्रामीण रुग्णालय मंठा येथे दिव्यांग बांधवांच्या मेळाव्याप्रसंगी तपासणी शिबिर आयोजित करून या दिव्यांग बांधवांना कोणत्या प्रकारच्या साहित्याची आवश्यकता आहे या संदर्भातील तपासणी करण्यात आली होत त्या तपासणीनुसार या कार्यक्रमात २६९ दिव्यांग बांधवांनी सहभाग घेतला होता

यावेळी बोलताना श्री लोणीकर म्हणाले की विधिमंडळातील माझे सहकारी मित्र आमदार श्री बच्चू कडू यांनी देखील दिव्यांग बांधवांच्या दृष्टिकोनातून अत्यंत मोलाचं काम केलं असून पक्ष वेगळे असले तरी काम करणाऱ्या व्यक्तीचं कौतुक निश्चितपणे आपण केलं पाहिजे अशा शब्दात आमदार बच्चू कडूंच्या कार्याचा गौरव आमदार लोणीकरांनी केला दिव्यांग बांधवांना कर्ज उपलब्ध करून देण्यापासून विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आपण देखील आपल्या मतदारसंघांमध्ये सातत्याने प्रयत्नशील असून या निमित्ताने दिव्यांग बांधवांची सेवा करण्याचे भाग्य मला लाभलं याचं मला समाधान आहे असेही यावेळी लोणीकर म्हणाले यावेळी गणेशराव खवणे, सतिशराव निर्वळ, राजेश मोरे, पंजाबराव बोराडे, कैलास बोराडे, नागेश घारे, विलास घोडके, दीपक बोराडे, शेषनारायण दवणे, सौ यमुना दवणे, तहसीलदार सोनाली जोंधळे, गटविकास अधिकारी गगनबोने, श्री बेहरा, पोलीस निरीक्षक निकाळजे, माऊली गोंडगे, राजेभाऊ खराबे, बाबाजी जाधव, गुलाब राठोड, प्रल्हादराव सरकटे बंडू नाना खरात अशोकअप्पा सोनटक्के, सोपानराव खरात, गणेशराव चव्हाळ, जानकीराम चव्हाण, जयश्री पवार, परमेश्वर शिंदे, शरद पाटील, भगवान देशमुख, तौफिक कुरेशी, दिनेश सराफ, शेख रहीम, अभिजात कोदंडे, श्रीदेव खरात, पवन रेंगे, शंकर फड यांच्यासह अनेक मान्यवर व दिव्यांग बांधव व त्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते

दीपक मोरे मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त विविध स्पर्धांच्या विजेत्यांना पुरस्कारांचे वितरण

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भोकरदन शहरातील दीपक पाटील मोरे मित्र मंडळाच्या वतीने गणेशोत्सव २०२४ विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान या पुरस्काराचे गुरुवारी एका भव्य कार्यक्रमात निर्मलाताई दानवे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. १९ सप्टेंबर २०२४ रोजी गणेशोत्सवाच्या निमित्ताने दीपक पाटील मोरे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित पुरस्कार वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निर्मलाताई रावसाहेब दानवे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष आशाताई माळी, रामेश्वर कारखान्याच्या संचालिका शोभाताई मतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यांच्या हस्ते बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. या घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोदवला त्यामध्ये सोल साईकल,चमचालिंबू, बकेट बॉल, नृत्य स्पर्धा, पोते उडी, चित्रकला, निबंध स्पर्धा व लाडक्या बहीणी करिता संगीत खुर्ची, बकेट बॉल या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.महिलांसाठी खास बक्षीस म्हणुन पैठणी साड्या व घरघुती वस्तुंचे वाटप करण्यात आले. पुरस्कार वितरण निर्मलाताई दानवे यांच्या हस्ते पार पडले.

तुळजाभवानी नवतरुण मंडळाचे योगदान

तुळजाभवानी नगरात दीपक पाटील मोरे मित्र मंडळाच्या वतीने ठेवण्यात आलेल्या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तुळजाभवानी नवतरुण गणेश मंडळाच्या तरुणांची मोठे सहकार्य मिळाले: आहे. गणेशोत्सव काळात दहा दिवस या तरुणांनी मंडळासमोर विविध उपक्रम राबविले. दरम्यान अशा उत्सव काळात सर्वांमध्ये बंधू भावाची व एकोप्याची भावना राहावी यासाठी आम्ही अशा स्पर्धांच्या आयोजन करीत असतो.

– दीपक पाटील मोरे, मंडळाचे पदाधिकारी

पाहिजेत (१००% अनुदानित)

ओम शिक्षण संस्था इटोली ता जिंतूर द्वारा संचलित

संत भगवानबाबा उच्च माध्यमिक आश्रमशाळा इटोली ता जिंतूर जी परभणी

उच्च माध्यमिक शिक्षक (शिक्षण सेवक)	१	[illegible]	[illegible]	[illegible]
		[illegible]		

स्वाक्षरीत
अध्यक्ष
ओम शिक्षण संस्था इटोली, ता. जिंतूर, जि. परभणी

संपर्क क्रमांक : ९४२१३९०९४८

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

विधानसभा निवडणुकीसाठी नियुक्त पथकांनी जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी

जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया शांततामय आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. या पथक प्रमुखांनी सजग राहून भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आपली जबाबदारी गांभीर्याने पार पाडावी, अशा सूचना जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित निवडणूक पथक प्रमुखांच्या बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्ह्यातील तिन्ही विधानसभा मतदार संघाचे सर्व उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व तहसीलदार, पोलीस यंत्रणेचे अधिकारी यांच्यासह सर्व पथक प्रमुख, सहायक पथक प्रमुखांची यावेळी उपस्थिती होती.

निवडणुकीसाठी नियुक्त प्रत्येक पथकाची जबाबदारी अतिशय महत्त्वाची आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी सर्व पथक प्रमुखांनी आपापली जबाबदारी समजून घेऊन ती काळजीपूर्वक पार पाडावी. निवडणूकविषयक कामाला प्राधान्य देत आपल्या पथकातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचा योग्य समन्वय ठेवून काम करावे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा होणार नाही, याची काळजी घ्यावी. आतापासूनच आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करावी, असे जिल्हाधिकारी श्री. गोयल यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी एसएसटी, एफएसटी, व्हीएसटी पथके नेमण्यासाठी दूरसंचार नेटवर्कचा विचार करुन ठिकाणे निश्चित करताना ती योग्य जागेवर निवडावीत. कारण त्या ठिकाणची माहिती घेण्यासाठी संवाद साधणे सोयीचे होईल, असे सांगितले.

अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनीही विधानसभेच्या आदर्श आचारसंहिता पालनाबाबत सूचना केल्या. नियुक्त सर्व पथक प्रमुखांनी नेमून दिलेली कर्तव्ये व जबाबदारी पार पाडताना अतिशय दक्ष राहण्याच्या सूचना यावेळी त्यांनी केल्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी सर्व पथक प्रमुख अधिकारी यांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीबाबत माहिती दिली. तसेच प्रत्येक पथक प्रमुख अधिकारी यांनी आपल्याला आवश्यक मनुष्यबळाचे योग्य नियोजन करुन निवडणूक कामकाजात कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना केल्या.

संत निरंकारी चॅरीटेबल ट्रस्टच्या वृक्षलागवडीची पाहणी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेवर संत निरंकारी चॅरीटेबल ट्रस्ट शाखा हिंगोलीच्या वतीने उभारल्या जाणाऱ्या घनवन वृक्ष लागवड उपक्रमास जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्या हस्ते वृक्षारोपनही करण्यात आले आहे.

हिंगोलीत संत निरंकारी चॅरीटेबल ट्रस्टच्या वतीने हिंगोली शहरात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जातात. ट्रस्टच्या वतीने नियमितपणे रक्तदान शिबीरे आयोजित करून हिंगोलीच्या शासकिय रुग्णालयातील रक्तपेढीत रक्तबाटल्या उपलब्ध करून दिल्या जातात. या शिवाय शासकिय रुग्णालयाच्या परिसरात साफसफाई मोहिम हाती घेऊन परिसर स्वच्छ केला जातो.

या शिवाय तीन वर्षापुर्वी शासकिय विश्रामगृहाच्या परिसरातील मोकळ्या जागेत घनवन तयार केले असून या ठिकाणी ११०० रोपे लावण्यात आली आहेत. या रोपांचे संगोपन देखील या ट्रस्टच्या वतीने केले जात असून सध्या रोपांचे झाडात रुपांतर झाले असून बहुतांश झाडे १५ फुट पेक्षा अधिक उंच वाढली आहेत.

त्यानंतर हिंगोली जिल्हा परिषदेच्या परिसरातील मोकळ्या जागेवर ११०० वृक्षलागवड करून त्याचे संगोपन करण्याचा निर्णय ट्रस्टने घेतला आहे. आता पर्यंत या ठिकाणी ४०० पेक्षा अधिक रोपे लावण्यात आली असून उर्वरीत रोपे लावण्याचे काम सुरु आहे. या ठिकाणी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप मुळे यांची उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते वृक्षलागवड करण्यात आली आहे. ट्रस्टच्या याउपक्रमाचे त्यांनी कौतूक केले. यावेळी कन्हैयालाल नेनवाणी, नानकराम नेनवाणी, संजय जाधव, मदन जाधव, राजू लोखंडे, आदिनाथ गुलगुले, प्रा. कुटे, ओम नेनवाणी, सोनु नेनवाणी, तेजस अलने, विठ्ठल जाधव, प्रभाकर लाडे, विकास नवले, कृष्णा लोखंडे, आरती नेनवाणी, ममता नेनवाणी, तन्वी नेनवाणी, मंगला कुटे उपस्थित होते.

मराठा समाजाच्यावतीने मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठींबा

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण सुरू केले असून त्यांच्या उपोषणाला पाठींबा देण्यासाठी मराठा समाजाच्यावतीने दि २२ सप्टेंबर पासून हिंगोलीतील छत्रपती शिवाजी महाराज पूतळा परिसरात आमरण उपोषण सुरू करण्यात येणार असल्याचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले आहे.

मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी १७ सप्टेंबरपासून मराठा आरक्षण मिळण्यासाठी आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे. गरजवंत मराठा समाजाच्या मुलामुलींच्या भवितव्यासाठी मनोज जरांगे यांनी उपोषण सुरू केले आहे परंतु सरकारकडून अद्यापही या उपोषणाची दखल घेतली नसून मनोज जरांगे यांची प्रकृती बिघडत चालली आहे. शासनाने या गंभीर मुद्द्यावर लवकरात लवकर निर्णय घेवून मराठा समाजाला आरक्षण द्यावे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला पाठींबा म्हणून हिंगोली जिल्ह्यातील सकल मराठा समाजाच्यवतीनेही आमरण उपोषणाला आजपासून बसणार आहेत. निवेदनावर सुनील पाटल गोरेगावकर, ॲड मनोज आखरे, विनायक भिसे, माधव कोरडे, बालाजी वानखेडे, भूषण देशमुख, रमेश शिंदे, संतोष कदम, दत्तराव उबाळे, अनुप नायक, दत्तराव नवघरे, दाजीबा पाटील, बद्रीनाथ घोंगडे, पप्पू चव्हाण, मनिष आखरे, अमोल जाधव,हरीओम बर्वे, निरंजन भोयर, एकनाथ भगत, बाळू वाबळे, राजेंद्र सरकटे, प्रशांत जगताप, त्र्यंबक गाडे, स्वप्नील जाधव, नितीन लोंढे, बबन गलंडे, शाम सोळंके, गोविंद शिंदे, साहेबराव खंदारे, देविदास मालेकर, शिवशंकर पठाडे, शिवशंकर घोंगडे आदींची उपस्थिती होती.

हिंगोली– येथील ऐतिहासिक सार्वजनिक दसरा महोत्सवाची तयारी सुरू करण्यात आली असून रामलीला मैदानावर हा दसरा महोत्सव विविध कार्यक्रमांनी साजरा केल्या जातो. यानिमित्त मैदानाची पाहणी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी केली. याप्रसंगी बांधकाम विभागाचे धाडवे, दसरा समितीचे मधुकर खंडागळे, दौलतराव बनसोडे, विनोद चव्हाण,सुधाकर सराटे आदी. छाया– विजय गुंडेकर

जिल्ह्यातील सहा आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचा प्रारंभ

तभा वृत्तसेवा
हिंगोली २१ सप्टेंबर

राज्यातील एक हजार महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा प्रारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज वर्धा येथून ऑनलाईन पध्दतीने झाला आहे. यामध्ये हिंगोली जिल्ह्यातील ६ महाविद्यालयांतील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा समावेश आहे.

येथील शिवाजीराव देशमुख सभागृहात संत तुकाराम कनिष्ठ महाविद्यालयातील केंद्राची कार्यक्रम आयोजित करून सुरुवात करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, दिनकरराव माने, दिलीप मस्के उपस्थित होते. तर जुनियर कॉलेज ऑफ एन्ट्रॉस ऑफ सायन्स न्ड आर्ट्स येथे कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे, आशिष वाजपेई, राहूल मेने यांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील हिंगोली येथील संत तुकाराम कनिष्ठ महाविद्यालय, जुनियर कॉलेज ऑफ एन्ट्रॉस ऑफ सायन्स न्ड आर्ट्स, वसमत येथील श्रीनिवास विद्यामंदीर कनिष्ठ महाविद्यालय, रावसाहेब पतंगे आर्ट्स कॉलेज, कळमनुरी तालुक्यातील कुर्तडी येथील सरस्वती इन्टेलेट्यूट ऑफ फार्मसी, कळमनुरी येथील कै. देवरावजी कल्याणकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या सहा महाविद्यालयातील आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा प्रारंभ आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आला.

कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक-युवतींना व्हावा या दृष्टिकोनातून राज्यातील नामांकित महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यात येत आहे. महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टिकोनातून आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र या योजनेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कौशल्य विकास केंद्राच्या माध्यमातून महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रामध्ये कौशल्याधारित प्रशिक्षण घेण्याची संधी प्राप्त होणार आहे. या उद्घाटन कार्यक्रमाला संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्या हस्ते विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

सुविधा कर्ज योजना व महिला समृध्दी योजनेच्या लाभार्थ्यांची २४ सप्टेंबरला लॉटरी पध्दतीने निवड

हिंगोली– येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत सुविधा कर्ज योजना (एनएसएफडीसी) ५ लाख व महिला समृध्दी (एमएसवाय) १.४० लाख या योजनेचे कर्ज मागणीचे ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी दुपारी १२ वाजता निवड समितीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चिठ्ठीद्वारे लॉटरी पध्दतीने होणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील वरील योजनेच्या अर्ज केलेल्या लाभार्थ्यांनी या निवड प्रक्रियेस स्वखर्चाने उपस्थित राहावेत. पात्र अर्जदारांची यादी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातील सूचना फलकावर लावण्यात आली आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) हिंगोली यांनी केले आहे.

टिप्परच्या अपघातात एकजण जागीच ठार

हिंगोली– हिंगोली ते सेनगाव रस्त्यावर गुरूवारी भरधाव टिप्पर क्र एमएच २८ बी बी १७४१ ने दुचाकी स्वार परमेश्वर सुभाना दिपके वय ५२ यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिल्यामुळे त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली असून शुक्रवारी दुपारी नर्सीनामदेव पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बद्रीनाथ सानप यांच्या पथकाने भेट दिली आहे. टिप्परचा चालक दिपके फरार झाला आहे. विशेष म्हणजे चालकाने टिप्परचे हँडब्रेक केल्यामुळे सदरील टिप्पर जागचे हालवतांना पोलिसांना चांगलीच कसरत करावी लागत आहे. टिप्परवर जय महाराष्ट्र, बापजी असे लिहीण्यात आले असून सदरील प्रकरणी नर्सी नामदेव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नर्सी पोलिस करीत आहे.

ईद मिरवणूक संदर्भात शहर पोलिस ठाण्यात बैठक

हिंगोली– ईद मिलादुन्नबी निमित्त मुस्लीम समाजाकडून शहरातून विविध मार्गावरून मिरवणूक काढण्यात येणार आहे. या संदर्भात येथील शहर पोलिस ठाण्यात शनिवारी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी मुस्लीम समाजाची बैठक घेतली. यावेळी शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आवाहन कोकाटे यांनी मुस्लीम समाजाला केले. याप्रसंगी शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, पोनि सुधीर वाघ यांची उपस्थिती होती.

उपविभागीय बांधकाम कार्यालयात रक्तदान शिबीराला प्रतिसाद

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

येथील उपविभागीय कार्यालय येथे दि २० सप्टेंबर रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला चांगला प्रतिसाद मिळाला.

सदर कार्यकारी उप अभियंता सुदेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिराचे एस.एस. मुटकुळे, उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, इमारती यांचे हस्ते उद्घाटन करण्यात येवून शिबिरास सुरवात करण्यात आली. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हिंगोली, कळमनुरी, औंढा ना. येथील अधिकारी, कर्मचारी वर्ग, शासकीय विश्रामगृह हिंगोली येथील कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ता, पत्रकार वर्ग यांनी स्वंयस्पुर्तीने रक्तदान शिबिरात जिल्हा सामान्य रुग्ण्यालय, हिंगोली येथील तज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली नावनोंदणी करून रक्तदान केले.

सदर रक्तदान शिबिरास डी.आर.धाडवे,जी.आर. खोरणे, ए.ओ.बुटोले, व्ही.एस.गोरे, ए.एम.इढोळे, ए.बी. मोहोड, इब्राहिम गौरवे, एन.जे.मोमीन, पी.एच. पाठमोचे, एम.एम.पठाण, एम.एच. शेख, शासकीय विश्रामगृह हिंगोली येथील कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

शांताबाई मुंजाजी दराडे विद्यालयातील विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाच्या दोन विद्यार्थ्यांनी शिकई मार्शल आर्ट या क्रीडा प्रकारात जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला असून त्यांची निवड छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा स्पर्धे साठी झाली आहे. यामध्ये कबीर सिद्धार्थ गोवंदे या विद्यार्थ्याने १४ वर्षे खालील वयोगटातून ४६ किलो वजन गटातून जिल्हास्तरीय शिकई मार्शल आर्टमध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून या माध्यमातून शाळेचे नावलौकीक केले आहे. तसेच कु.सोनल सिद्धार्थ गोवंदे या विद्यार्थिनीने १७ वर्षे खालील वयोगटातून ५० किलो वजन गटातून प्रथम क्रमांक मिळवून शाळेच्या नावलौकीकात भर घातली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी हिंगोली यांच्यामार्फत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन बहिर्जी स्मारक विद्यालय वसमत या ठिकाणी करण्यात आले होते. यशस्वी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक क्रीडा अध्यापक अनिल लोळवार यांचा शाळेच्यावतीने मुख्याध्यापक डॉ.प्रकाश स. अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट, पर्यवेक्षक तुलसी चिलमुल यांनी सत्कार केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेच्या सर्व संचालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

सांदीपनी पब्लीक स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची कॅरम स्पर्धेत विभागावर निवड

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ सप्टेंबर

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नांदेड आणि नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धा दि.८ ते ९ सप्टेंबर २०२४ दरम्यान श्री गुरु गोविंदसिंघ जी स्टेडियम, म.न.पा.बॅडमिंटन हॉल,नांदेड येथे पार पडली.

या स्पर्धेत स्थानिक संदिपानी पब्लिक स्कूल,सुनील नगर, तरोडा बुद्रुक, नांदेड येथील १४ वर्षे मुले या वयोगटात शेख फरहान हुसेन आणि १७वर्ष मुले या वयोगटात आरव विशाल जाधव यांनी जिल्हास्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे सुवर्णपदक पटकावले असून लातूर येथे होणाऱ्या विभागस्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ.रेश्मा विपुल राठोड, सौ.माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका श्रीमती क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीतकौर, प्रशासक मारुती मेखाले, क्रीडाशिक्षक भाऊराव राठोड आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवरील अतिक्रमण हटविले

तभा वृत्तसेवा
भोकर, दि. २१ सप्टेंबर -

येथील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नियोजित पुतळ्याच्या जागेवरील दोन व्यापाऱ्यांनी केलेले अतिक्रमण प्रशासनाच्या वतीने दिनांक २१ सप्टेंबर रोजी सकाळी हटविण्यात आले यावेळी भोकर चे तहसीलदार सुरेश घोळवे,न.प.चे मूख्याधिकारी पवार,पोलीस निरीक्षक सुभाषचंद्र मार्कड आदिंची उपस्थिती होती.

सदरील कार्यवाहीमुळे आंबेडकर अनुयायांनी फटाके वाजवून मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात आला. भोकर शहरातील सर्वात महत्त्वाचा वर्दळीचे

ठिकाण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक पोलीस स्टेशन कडे जाणाऱ्या रस्त्याकडे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची नियोजित जागा धरण्यात आली होती मात्र शहरातील दोन व्यापाऱ्यांनी या जागेवर अतिक्रमण केले होते यापूर्वी अतिक्रमण हटवण्याची सूचना सदर व्यापाऱ्यांना देण्यात आली तेंव्हा त्यांनी कबाल्याचा आधार घेवून न्यायालयाचे दार ठोठावून येथे तात्पुरता स्टे मिळवत होते परंतु आंबेडकरी जनतेच्या रेट्यामुळे प्रशासनाने सदरील दोन व्यापाऱ्यांची मालमत्ता ईतरत्र असल्याचे न्यायालयात सिद्ध केल्याने न्यायालयाने साधारणपणे एक महिन्यापूर्वी सदरील दोन व्यापाऱ्यांचे कबाले रद्द करण्यात आले होते अतिक्रमण हटवण्याचा विषय पुन्हा लांबणीवर जावू नये म्हणून पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्त्यांनी दि. २० सप्टेंबर रोजी तहसीलदार व उपविभागीय अधिकाऱ्यांना सात दिवसाच्या आत अतिक्रमण हटविण्यात यावे अन्यथा आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला होता परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन येथील तहसीलदार सुरेश घोळवे यांनी मुख्याधिकारी व पोलीस प्रशासनाला सूचना दिल्याने अतिक्रमण तातडीने हटविण्यात आले मागील ४० वर्षापासून प्रलंबित असलेला अतिक्रमणाचा विषय कायमस्वरूपी निकाली काढण्यात आला भोकर पो. स्टे.चे पोलीस निरीक्षक सुभाष चंद्र मार्कड यांनी तगडा पोलीस बंदोबस्त या ठिकाणी लावला होता सदरील निर्णयामुळे तालुक्यातील तमाम बौद्ध आणि आंबेडकरी अनुयायामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

अभि. प्रशांत ठमके यांना शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरीसाठी जीवन गौरव पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा
किनवट, दि. २१ सप्टेंबर -

स्व. गंगाधरराव पांपटवार जयंती महोत्सव व स्व. गंगाधरराव पांपटवार वैद्यकीय सहकारी संस्था संचलित टीचर्स क्लब रुग्णालय या सेवाभावी हॉस्पिटलच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त सोमवार दिनांक १६ सप्टेंबर २०२४ रोजी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा जीवन गौरव पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

कुसुम सभागृह नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी केंद्रीय राज्यमंत्री सूर्यकांताबाई पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे, स्वागताध्यक्ष प्रा. डी. बी. जांभरुणनर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना जीवनगौरव पुरस्कारने सन्मानित केले. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक जगदीश कदम (साहित्य), बालाजी जाधव (उद्योजकता), डॉ. जगन्नाथ (नाथा) चितळे (कला), ज्ञानेश्वर महाराज (समाजसेवा), गोपाळ पा. इजळीकर (कृषी), चारुदत्त चौधरी (पत्रकारिता) यांचा समावेश होता.

अभियंता प्रशांत ठमके यांनी मिलिंद शिक्षण प्रसारक मंडळ,अंबाडी आणि मातोश्री कमलताई ठमके बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,गोकुंदा या सारख्या संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्याच्या ठिकाणापासून दीडशे किलोमीटर अंतरावर असलेल्या विदर्भ विभाग व तेलंगणाच्या राज्याच्या सीमेवरती वसलेल्या आदिवासी दुर्गम, डोंगरी, आदिवासी

किनवट तालुक्यात प्राथमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक शाळा स्थापन केल्या तसेच कनिष्ठ महाविद्यालय सुद्धा स्थापन केले. खेड्यातील मुलांना तालुक्याच्या ठिकाणी शिक्षण घेता यावे याकरिता वस्तीगृह स्थापन केले. त्यांच्या याच शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना मान्यवराचा हस्ते सन्मानपत्र व वस्त्र देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी नांदेड व परिसरातील सुज्ञ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते.स्व. गंगाधरराव पांपटवार वैद्यकीय सहकारी संस्थेचे अध्यक्ष गजानन पांपटवार व तिरूमला फाउंडेशनच्या सचिव अंजली पांपटवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

संक्षिप्त वृत्त

उमरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे संविधान मंदिर उदघाटन सोहळा संपन्न

उमरी-महाराष्ट्र शासन आदेशानुसार उमरी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय .टी आय) मध्ये जागतिक लोकशाही दिना निमित्य संविधान मंदिराचे उदघाटन सोहळा दि १५ सप्टेंबर रोजी पार पडला आहे . महाराष्ट्रातील ४३४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय टी .आय) मध्ये १५ सप्टेंबर २०२४ रोजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने संविधान मंदिरचे उद्धघाटन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने उमरी आय टी आय मध्ये अनेक मान्यवराला बोलावून संविधान मंदिराचे उद्धघाटन करण्यात आले भारतीय संविधान या पवित्र ग्रंथाचे ध्येय , धोरण , महत्व , अर्टीकल , महत्व विद्यार्थांना पटवून देण्यात आले दि १२ ते १४ सप्टेंबर २०२४ रोजी या कालावधीत आय टी आय मध्ये संविधानाचे महत्व देत निबंध स्पर्धा , रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या रांगोळी स्पर्धेत प्रथम बक्षीस राधीका शिलेवाड यांना तर व्दितीय बक्षीस गोदावरी दिगांबर अंबटवाड यांना तर तृतीय बक्षीस सुमया म्हैबुब शेख यांनी बक्षीसाचे मानकरी ठरले आहे आणि निबंध स्पर्धेत प्रथम बक्षीस धात्रक दत्ता विठ्ठल , व्दितीय सदाशिव नागोराव शिंदे , तृतीय उत्कर्ष शिंदे यांना मिळाला आहे दि १५ सप्टेंबर रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखीत संविधान या राज्यघटने वर मान्यवरानी प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना संबोधीत केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ट नेते गंगाधरराव सवई , प्रमुख पाहुणे नगरसेवक प्र सोनू वाघमारे , डी जी तुपसाखरे , भिमराव वाघमारे , कैलास सोनकांबळे संदिप गोवंदे , साहेबराव तुरेराव , राहुल सोनकांबळे , सचिन खंडेलोटे आदी मान्यवर पत्रकार होते या कार्यक्रमाचे सुसज्ज नियोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था चे प्राचार्य जे एल गायकवाड यांनी केले होते कार्यालयीन निदेशक एम बी परदेशी , सौ एसी भोसले , कदम एस एल , गुजराड एम डी , माळी ए.बी , खुपसे जी जी , चिक्केवार एन एल , आर्सेवाड , सुर्यवंशी विशाल तर या कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन मनिष परदेशी यांनी केले तर आभार प्राचार्य गायकवाड जे .एल यांनी मानले आहे .

ज्ञानेश्वर मगरे यांची युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्षपदी निवड

मुदखेड-भोकर विधानसभा अध्यक्षपदी ज्ञानेश्वर मगरे पाटील यांची निवड करण्यात आली असून. गाव तिथे शाखा घर तिथं कार्यकर्ता अभियान राबवून काँग्रेसची विचारधारा तसेच ध्येयधोरणे घरा घरात पोहचवण्याचा निर्धार या वेळी करण्यात आला आहे. जिल्ह्यात युवक काँग्रेसची मोट बांधण्या साठी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे पाटील यांनी प्रत्येक विधानसभेत कार्यकारणी विस्ताराचा निर्णय घेतला आहे. भोकर विधानसभा मतदारसंघ जिल्ह्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असून, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसला राम राम ठोकल्या नंतर, युवक काँग्रेसच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोट बांधणीचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, जिल्ह्यातील विधानसभा अध्यक्षांच्या निवडी करण्यात येत आहेत. भोकर विधानसभा अध्यक्ष पदी ज्ञानेश्वर मगरे पिंपळकोठेकर यांची निवड करण्यात आली असून. नुकतेच नियुक्ती पत्र बहाल करण्यात आले आहे. काही दिवसातच विधानसभा निवडणुकांचा बिगुल वाजणार आहे. या धरतीवर या निवडीस महत्व आले आहे. युवकांची मोठी फळी असलेल्या युवा कार्यकर्ते ज्ञानेश्वर मगरे पाटील यांच्यावर ही जबबदारी सोपविण्यात आली आहे. नियुक्तीचे पात्र जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे पाटील, माजी नगराध्यक्ष रहबहादुर कोत्तावार, माझी उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव देवदे, काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष प्रतापराव देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, काँग्रेस तालुका उपाध्यक्ष तेजबराव मुंगल, श्रीनिवास महद्वाड, युवक काँग्रेस शहर अध्यक्ष मुजीब पठाण, सूर्यकांत चौदांते यांच्या हस्ते देण्यात आले. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना हद्दपार करण्याचा तसेच भूमिपुत्र निवडून आणायचा यावेळी निर्धार करण्यात आला. या वेळी प्रशांत पाटील मुगल, विलास कल्याने, शरद पवार, दत्ता कदम, शिवम मगरे, संभाजी गाढे, बापूजी गाढे, अविनाश चौदंते आदी उपस्थित होते.

अनु,जाती, जमातीच्या शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचे वाढीव अनुदान देण्याची मागणी

भोकर -महाराष्ट्र शासनाने अनु.जाती जमातीच्या सन २०२३-२४ अंतर्गत नवीन विहीरीचे खोदकाम व बांधकाम केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना देण्यात येणारे अनुदान अत्यंत अल्प असल्याने सदरील शेतकऱ्यांना आणखीन दीड लाख असे ४ लक्ष रुपये वाढवून देण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अल्पभूधारक शेतकरी लक्ष्मण हिरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. अनु. जाती, जमातीच्या लाभार्थी शेतकऱ्यांना फक्त रुपये २ लाख ५० हजार अनुदान मिळते हा दुजाभाव दिसून येतो तेव्हा अनु. जाती,जमातीच्या शेतकऱ्याना किमान रुपये ४ लक्ष अनुदान देण्यात यावे अशी मागणी एल.ए.हिरे यांनी केली आहे.निवेदनाच्या प्रति मुख्य सचिव सामाजिक न्याय विभाग मंत्रालय मुंबई, आमदार भीमराव केराम, कृषी आयुक्त पुणे, जिल्हाधिकारी, कृषी अधिक्षक नांदेड यांना पाठविण्यात आल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यात हरित ऊर्जा सौर क्रांती मोहीमेस सुरुवात

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

हरित ऊर्जा सौर क्रांती अंतर्गत जिल्ह्यात ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांमध्ये मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून विकसित केले जाणार आहे. अशा गावाला केंद्रीय आर्थिक सहाय्य म्हणून १ कोटी रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. जिल्ह्यात हरित ऊर्जा सौर क्रांती मोहीम सुरु करून ही चळवळ यशस्वी करण्यासाठी चछछए ने जच् दिनांक ९ ऑगस्ट २०२४ नुसार मॉडेल सोलर व्हिलेज मार्गदर्शक तत्वे निर्गमीत केली आहेत. या मार्गदर्शक तत्वानुसार मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून गाव विकसित केले जाणार आहे.

एक गाव मॉडेल सोलर व्हिलेज म्हणून विकसित करण्याबाबत एमएसईडीसीसीएलचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी सूचित केले आहे. या योजनेबद्दल जिल्ह्यात ५ हजार पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावामध्ये माहिती देऊन अधिकाधिक गावांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाणार आहे. मॉडेल सोलर व्हिलेजसाठी पात्र असलेल्या जिल्ह्यातील गावांना ओळखून सदर गावे पीएम-सूर्यः मुफ्त बिजली योजनेसाठी हरित आणि स्वच्छ ऊर्जा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणकडे पाठविण्यात येणार आहेत.

थकबाकीदारांची कर्ज माफी करा- तलवारे

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळा तर्फे कर्ज घेणाऱ्या राज्यातील २००८ पासूनच्या लाभार्थ्यांची कर्ज माफी करावी तसेच महामंडळास मिळणारा निधी वाढवावा अशी मागणी अन्याय प्रतिकार दलाचे संस्थापक कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सिध्दार्थ तलवारे यांनी मुख्यमंत्र्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अन्याय प्रतिकार दलाच्यावतीने दिलेल्या निवेदनात तलवारे यांनी म्हटले आहे की म. फुले मागासवर्ग विकास महामंडळातर्फे बौद्ध व नवबौध्द समाजातील गरजू व्यक्तींना व्यवसायासाठी कर्ज दिले जाते. यातून त्यांची आर्थिक उन्नती व्हावी असा या मागचा उद्देश आहे. शासनाने अनेकदा इतर महामंडळाच्या कर्जदारांची कर्जे माफ केली आहेत तथापी म. फुले महामंडळाची सन २००८ पासून एकदाही कर्जमाफी केली नाही, त्यामुळे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून राज्यातील लाभार्थ्यांचे कर्ज माफ करावे व महामंडळास वाढीव निधी द्यावा अशी मागणी सिध्दार्थ तलवारे यांनी केली आहे.

सिडको येथे डॉ. आंबेडकर पार्क निर्माण करणे संघर्षमय कार्य: भंते बोधिधम्मो

तभा वृत्तसेवा
नवीन नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

सिडको येथील मनपाच्या मध्यवर्ती जीर्ण उद्यानाची साफसफाई करून त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क असे नामकरण करून त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण दिनांक १८ सप्टेंबर२०२४ रोजी भाद्रपद पौर्णिमा व सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिना निमित्त धम्मगुरू भंते बोधिधम्मो यांच्या हस्ते बुद्ध वंदना घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

सिडको येथील गुरुवार बाजारा लगत असलेला मनापाचा मध्यवर्ती उद्यान गेल्या काही वर्षापासून पडीक होता त्यात काटेरी झाडे झुडपे व अनावश्यक वनस्पतीने अगदी जंगलाचे स्वरूप आले होते. तसेच घाणीचे साम्राज्य वाढले होते. सिडकोतील सर्वात मोठा घाण पाण्याचा नाला येथून जातो त्यांची दुर्गंधी वाढुन आजूबाजूस मालकीच्या वास्तव्यास असलेल्या नागरिकांना त्याचा खूपच त्रास होता. सदरील जीर्ण व पडीक गार्डनमध्ये काही अनुचित प्रकारही घडत होते. या सर्व बाबींचा विचार करून सिडको हडको परिसरातील भीमसैनिकांनी व आंबेडकरी चळवळीतील समाज बांधवांनी सदरील गार्डनची स्वच्छता करण्यासाठी व स्वच्छता राखण्यासाठी मनापाचे आयुक्त डॉ. महेश कुमार डोईफोडे यांना निवेदन देऊन सदरील गार्डनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क नाव देण्याची व पूर्णाकृती पुतळा बसवण्याची मागणी गेल्या एक महिन्यापासून केली होती. त्यानंतर प्रशासनाने कांही उत्तर न दिल्याने बौद्ध समाज बांधवांनी समाजाच्या सहभागातून स्वखर्चाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क स्वच्छ करून पार्कच्या मध्यवर्ती ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा बसवून फटाक्यांची आतिषबाजी करून जल्लोष करण्यात आला.दिनांक १८ सप्टेंबर भाद्रपद पौर्णिमा व सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिदिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कमध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी धम्मगुरु भंते बोधिधम्मो यांनी धम्म वंदना व पूजा पाठ करून पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याच वेळी धम्मगुरू भंते बोधिधम्मो यांनी धम्मदेशना करत असताना सांगितले की समाज हितासाठी समाज बांधवांना नेहमीच संघर्ष करावा लागतो आणि अशाच संघर्षातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कची निर्मिती झाली. सदर कार्यास समाज बांधवांना मोठा संघर्ष करावा लागला असे उपस्थितांना संबोधित केले. अनावरण सोहळ्यास उपस्थितांना अन्नदान साहेबराव भंडारे यांनी केले तर उपस्थितांचे गायनाच्या माध्यमातून शाहीर बापूराव जमदाडे यांनी मनोरंजन केले. यावेळी परिसरातील समाज बांधवांची लहान थोर, मालक बालिका, महिलांची उपस्थिती होती.सदरील पार्क मध्ये येणाऱ्या दर पौर्णिमेला अन्नदान करण्याचे समाज बांधवांनी ठरवल्याचे समजते.

उत्कृष्ट कामगार पुरस्काराने गुणवंत मिसलवाड सन्मानीत

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार या आस्थापनेत यांत्रिकी विभागात कार्यरत असलेले दैनंदिन वाहन देखभाल (मेन्टनन्स मेकॅनिक) तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांना एसटी डेपो नांदेड आगाराच्यावतीने सन २०२४ या वर्षात उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल रा.प.म. नांदेड आगाराच्यावतीने उत्कृष्ट कामगार म्हणून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या भव्य अशा कार्यक्रमामध्ये आगार व्यवस्थापक अनिकेत बल्लाळ यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मा.श्री. विष्णू हारकळ, श्रीनिवास रेणके, वाहतुक निरीक्षक शेख मोबीन, सुधाकरराव घुमे, आगार लेखाकार सतीश गुंजकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

गुणवंत एच. मिसलवाड यांना यापूर्वी गुणवंत कामगार म्हणून राज्यपाल पुरस्कार, अशोक लिलँड कंपनी प्रा. लि. कंपनीच्यावतीने हाई मायलेज ॲवार्ड तसेच सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार असे अनेक सामाजिक पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. ते प्रवाशी सेवेबरोबरच सामाजिक क्षेत्रातही त्यांचा सक्रीय सहभाग असतो. त्यांना हा एसटी महामंडळ नांदेड आगाराचा उत्कृष्ट कामगार म्हणून गौरव झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यावेळी आगारातील कामगार-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मालपाणी मतिमंद विद्यालयाचा स्तुत्य उपक्रम : सीईओ करनवाल

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

नवीन तंत्रज्ञानामुळे उपचार महागडा झाला आहे. सर्वसामान्य रुग्णांना उपचार करणे आर्थिकदृष्ट्या खर्चिक झाले आहे. अशावेळी सातत्यपूर्ण १३ वर्ष मेंदुचे विकार असलेल्या मुला-मुलींसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करणे हा राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी केले आहे.

मुंबई येथील जय वकील फांउडेशन अँड रिसर्च सेंटर, बि. जे. वाडिया चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, एसआरसीसी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल व येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या वतीने आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मेंदुचे विकार असलेल्या मुला-मुलींसाठीच्या आरोग्य शिबिरास गुरूवार दि. १९ सप्टेंबर रोजी प्रारंभ झाला असून शुक्रवारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी आरोग्य शिबिरास भेट देवून याबाबतची माहिती घेतली. यावेळी राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, उपाध्यक्ष कमल कोठारी, सचिव प्रकाश मालपाणी, कोषाध्यक्ष जयप्रकाश काबरा, सहसचिव डॉ. लक्ष्मीकांत बजाज, बनारसीदास अग्रवाल, डॉ. सुरेश दागडीया, अंकित अग्रवाल, संजय बजाज व मूख्याध्यापक नितीन निर्मल यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल म्हणाले की, आरोग्य शिबिराच्या माध्यमातून राजस्थानी शिक्षण संस्था सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे कार्य करत आहे. यापुढेही आरोग्य शिबिराची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी होऊन अधिकाधिक रुग्णांना याचा लाभ व्हावा यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने आरोग्य शिबिराच्या यशस्वितेसाठी आवश्यक ते सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी भेट दिली.

दोन दिवसात जवळपास ६०० रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले आहे. आरोग्य शिबीर यशस्वी व्हावे यासाठी संस्था पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली मूख्याध्यापक नितीन निर्मल यांच्या नियोजनात आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय व श्री रामप्रताप मालपाणी मूक बधिर विद्यालयाचे कर्मचारी परिश्रम घेत आहेत. या आरोग्य शिबिराचा हजारो रुग्णांना लाभ होत आहे. हे आरोग्य शिबीर रुग्णांच्या चेहऱ्यावर हास्य तर त्यांच्या पालकात समाधान व्यक्त करणारे ठरले आहे.

टीम डॉ. अनैता हेगडेंचे कार्य प्रशंसनीय - डॉ. अजय मालपाणी

मुंबई येथील जय वकील फांउडेशन अँड रिसर्च सेंटर, बि. जे. वाडिया चिल्ड्रेन्स हॉस्पिटल, एसआरसीसी चिल्ड्रेन्स हॉस्पिटल व येथील राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून डॉ. अनैता हेगडे, डॉ. अवि शहा व डॉ. अशा चिटणीससह ३५ डॉक्टरांची टीम सकाळी नऊ ते रात्री ११ या वेळेत रुग्णांवर मोफत तपासणी व उपचार करित आहेत. समाजाचे देणे लागतो या भावनेतून केलेले हे कार्य प्रशंसनीय असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतून या शिबिरास भेट देण्यासाठी आलेल्या रेडीओलॉजिस्ट डॉ. अजय मालपाणी यांनी केले आहे.

डॉ. रविंद्र सिंघल यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

नांदेडचे तत्कालीन पोलीस अधीक्षक तथा नागपूरचे विद्यमान पोलीस आयुक्त डॉ रविंद्रकुमार सिंगल यांच्या वाढदिवसा निमित्त पोलीस अंमलदारांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन गणपती मंदिर पोलीस मुख्यालयाच्या आवारात करण्यात आले होते.

या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. शेकडो पोलीस कर्मचाऱ्यांनी रक्तदान केले. नांदेड पोलीस मित्र परिवार आणि श्री स्वामी समर्थ ब्लड डोनर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमा दरम्यान वृक्षारोपण करण्यात आले तसेच लकी ड्रॉ पद्धतीने यावर्षी रक्तदात्याला एकूण ११ सायकली भेट देण्यात आली. डॉ. रविंद्र कुमार सिंगल यांच्या वाढदिवसा निमित्त दरवर्षी पोलीस अंमलदारांकडून हा उपक्रम राबवला जातो. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी पोलीस अंमलदार प्रवीण आम्लकंठवार, दत्ता गायकवाड, प्रकाश मामुलवार, अनिल मुपडे,आनंद भाडेकर, प्रदीप ऐमेकर यांच्या सह २००७ बॅचच्या सर्व पुरुष आणि महिला अंमलदारांनी परिश्रम घेतले आणि वाढदिवसानिमित्त चे विविध उपक्रम यशस्वी केले आहेत.

अतिवृष्टीग्रस्त भागाचे सरसकट पंचनामे करा अन्यथा आंदोलन : प्रवीण घुले

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. २१ सप्टेंबर -

शहरातील नदीकाठच्या सखल भागांमध्ये अतिवृष्टीमुळे घरामध्ये पाणी शिरून घरगुती सामानाचे व अन्नध्यानाचे मोठे नुकसान झाले आहे. याचा जयभीमनगर प्रभाग क्रमांक सात सह परिसरातील भागाचा सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

नांदेड शहरासह जिल्हाभरामध्ये दि. ३१ अगस्त ते ३ सप्टेंबर दरम्यान मोठी अतिवृष्टी झाली होती. नदीकाठच्या परिसरातील सखल भागातील वस्त्यांतील घरामध्ये दोन ते तीन फुटापर्यंत पाणी शिरले होते. त्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे सरसकट पंचनामे करून संबंधित नुकसानग्रस्तांना भरपाई देऊन दिलासा देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे केली आहे. शहरामध्ये झालेल्या

अतिवृष्टीमुळे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले असल्याचे निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा शहर सरचिटणीस प्रवीण घुले यांनी सांगितले आहे .

यामध्ये मुख्यत्वे करून जयभीमनगर , श्रावस्तीनगर , नारायण पाटीलनगर, लालवाडी , सादतनगर , एमके कॉर्नर, सावित्रीबाई फुलेनगर, भीमसंदेश कॉलनी , तथागतनगर, सीतामाई कॉलनी , नोबल कॉलनी व राजनगर - नागसेननगरचा काही भाग तसेच श्रावस्तीनगर येथील नाल्यावरील टेकडा भागाचा समावेश आहे. या भागाचे सरसकट सर्वेक्षण करून नुकसानग्रस्तांना भरपाई द्यावी अशी मागणी प्रवीण घुले यांनी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे , उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, देवेंद्र फडणवीस तसेच मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांना दिले आहे.